THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 2ND JANUARY 1890.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८९ चा मसुदा नंबर ३.

**मुंबई इलाख्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसाचें नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.**

अनुक्रमणिका.

कलमें.

**बाब १ ली.—प्रथमारंभींचे नियम.**

१. लहान सरनामा.
व्याप्ति.
सिंध, एडन व त्याचीं ताबेदार संस्थानें आणि पेरिम यांस लागू करणें.
२. कायदे रद्द केले आहेत.
३. व्याख्या.
"इन्स्पेक्टर जनरल," "डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट," "आसिस्टंट सुपरिंटेंडेंट"
"पोलीस अमलदार."
"कान्स्टेबल."
"जिल्हा."
"मार्ग."
"गुरें."
क्रिमिनल प्रोसिजर कोडांत व्याख्या दिलेले शब्द व संज्ञा.

कलमें.

**बाब २ री.—पोलीसची रचना.**

सामान्य.

४. दरेक जिल्ह्यांत पोलीस फौज ठेविली जाईल.
५. (१) इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस याची नेमणूक व त्याचा अधिकार.
(२) त्याला सस्पेंड अगर बर्तर्फ करणें.
६. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट व आसिस्टंट सुपरिंटेंडेंट यांची नेमणूक.
७. कमिशनरांस व इन्स्पेक्टरांस माजिस्ट्रेटी अधिकार असतील.
ते अधिकार त्यांनीं सरकारच्या हुकुमांस अनुसरून चालविले पाहिजेत.
८. इन्स्पेक्टरांची नेमणूक.
९. इन्स्पेक्टरच्या दर्जाखालच्या पोलीस अमलदारांची नेमणूक.

कलमें.

१०. इन्स्पेक्टरांस नेमणुकीचा दाखला दिला पाहिजे.

११. इन्स्पेक्टरच्या हाताखालच्या पोलीस अमलदारांस हुद्याचे दाखले द्यावे.

सदर्हू प्रकारचे दाखले धारण करणाऱ्यांचे अधिकार.

असे दाखले रद्द बातल केव्हां होतात तें.

दाखले धारण करणारांचे अधिकार वगैरे कांहीं वेळपर्यंत बंद ठेवणें.

१२. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाचे सामान्य अधिकार.

१३. जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाचा निर्बंध.

सरकारच्या कानूंस व हुकुमांस व कमिशनराच्या कायदेशीर हुकुमांस पात्र राहील.

पोट-कलम (१) यांच्या हेतूंस इन्स्पेक्टर जनरल यानें पुष्टी आणिली पाहिजे.

१४. जिल्हा माजिस्ट्रेटानें मागितल्याबरोबर इन्स्पेक्टर जनरलानें कोणत्याहि जिल्ह्यास जास्त पोलीस फौज दिली पाहिजे.

१५. जिल्हा माजिस्ट्रेटास डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडून रिपोर्ट मागविण्याचा अखत्यार आहे.

१६. आपल्या जिल्ह्याच्या पोलीस फौजेवर देखरेख करण्याचे जिल्हा माजिस्ट्रेटाचे सामान्य अधिकार.

१७. पोलीस फौजेस कामास लावण्याच्या संबंधानें हुकुम करण्याचा कमिशनराचा अधिकार.

असा हुकुम साधारणतः जिल्हा माजिस्ट्रेटास करून इन्स्पेक्टर जनरलास कळवावा.

१८. आपल्या भागांतील पोलिसाचीं व्यंगें इन्स्पेक्टर जनरलाच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याचा कमिशनरास अखत्यार आहे.

१९. गुन्ह्यांची स्थिति वगैरे बाबतींत रिपोर्ट करण्यासाठीं जिल्हा माजिस्ट्रेटास हुकुम करण्याचा कमिशनरास अखत्यार आहे.

२०. पोलिसाच्या जमाखर्चाच्या सर्व बाबतींबद्दल चौकशी करण्याचा कमिशनरास अखत्यार आहे.

कलमें.

स्पेशल.

२१ स्पेशल पोलीस अमलदार नेमणें.

स्पेशल पोलीस अमलदारांचे अधिकार व जबाबदाऱ्या.

जाद्दा व प्युनिटिव.

२२. खासगी मनुष्यांच्या मागणीवरून जास्त पोलीस कामावर ठेवणें.

२३. मोठालीं कामें बांधीत असलेल्या मनुष्यांच्या खर्चानें त्या कामाजवळ जादा पोलीस ठेवणें.

२४. प्युनिटिव पोलीस ठेवणें.

२५. गेल्या शेवटल्या तीन कलमांखालचे कर व खर्च वसूल करणें.

---

## बाब ३ री.

पोलीस फौजेचें नियमन करणें तिजबद्दल निर्बंध ठेवणें व तिला कवाईत वगैरे शिकविणें.

२६. पोलिसाचा कारभार चालविण्यासाठीं कानू करणें.

२७. इन्स्पेक्टर जनरलास पत्रक वगैरे मागविण्याचा अखत्यार आहे.

२८. काम करण्यांत निष्काळजीपणा वगैरे याबद्दल पोलीस खात्याच्या द्वारें पोलीस अमलदारांस शिक्षा.

ह्या कलमांतील शिक्षा कलमें ३५,५७ अगर ५८ याखालच्या गुन्हेगाऱ्यांशिवाय आणखी आहे.

२९. शिक्षा करितांना काम कसें चालवावें तें.

३०. शिरजोरपणाबद्दल पोलीस खात्याच्या द्वारें शिक्षा.

३१. पोलीस अमलदार नेहमीं कामावर आहेत असें मानिलें पाहिजे; आणि ते इलाख्याच्या कोणत्याहि भागीं कामावर पाठविले जाण्यास पात्र आहेत.

कलमें.

३२. (१) पोलीस अमलदारानें व्यापार करूं नये.

(२) परवानगी घेतल्यावांचून असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या खालच्या दर्जाच्या पोलीस अमलदारांनीं इतर नोकरी धरूं नये.

(३) पोलीस अमलदार रजेवर अगर सस्पेंड केलेला असतांहि हे मनाईचे ठराव लागू राहतील.

३३. (१) पोलीस अमलदारानें राजीनामा देण्यास कोणत्या शर्ती लागू आहेत.

(२) ह्या कलमांतील ठराव मोडणाऱ्या पोलीस अमलदाराचा पगार सरकारांत जमा करण्याचा अखत्यार आहे.

३४. (१) पोलीस अमलदार न राहिलेल्या मनुष्यानें दाखला, हत्यारें, इत्यादि हवालीं केलीं पाहिजेत, आणि

(२) तीं हवालीं केलीं नाहींत तर तीं झाडा घेण्याच्या वारंटानें धरण्याचा अखत्यार आहे.

३५. (१) पोलीस अमलदारांच्या गैरवर्तणुकेबद्दल शिक्षा.

(२) रजा संपतांच कामावर परत येण्यास चुकल्याचा परिणाम.

३६. हुद्याचा दाखला हवालीं करण्यास चुकल्याचा परिणाम.

---

बाब ४ थी पोलीससंबंधीं नियम.

३७. (१) रस्त्यांची वहिवाट वगैरे बाबतींत कानू करण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

(२) अशा कानू प्रसिद्ध करण्याची रीत.

३८. जिल्हा माजिस्ट्रेटास, सुरुंग लावण्याच्या व खणण्याच्या संबंधाच्या कानू करण्याचा अखत्यार आहे.

३९. छिनालवाडे बंद करणें.

४०. (१) अव्यवस्था न होऊं देण्याकरितां माजिस्ट्रेटांनीं हुकुम करणें.

४१. (१) जत्रांच्या वगैरे ठिकाणीं रोगाची सांत न उठूं देण्याबद्दल विशेष तजवीज करण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

कलमें.

(२) अशा प्रसंगीं फी वसविणें.

४२. मनुष्यांच्या टोळ्या अगर मंडळ्या मोडून टाकणें.

४३. रंजनाच्या सार्वजनिक जागा व जाहीरसभा यांतल्या अव्यवस्थेबद्दल वगैरे पोलिसानें बंदोबस्त केला पाहिजे.

४४. सार्वजनिक रस्त्यांवर जमलेल्या लोकांचें वगैरे पोलिसानें नियमन करावें.

४५. (१) कुत्र्यांच्या संबंधानें ठराव.

(२) पोलिसांनं कुत्र्यांचा नाश केव्हां करावा व ते केव्हां विकावे.

(३ ज्यावर धन्याचा पत्ता लिहिला आहे असा पट्टा असलेल्या कुत्र्याबाबद ठराव.

४६. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें आणि जिल्हा माजिस्टेटांनीं ह्या बाबीखालचे अधिकार अनुक्रमें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाच्या व सरकारच्या निर्बंधास पात्र राहून चालविले पाहिजेत.

---

बाब ५ वी.

पोलिसाचे बजावणीचे अधिकार व त्यांचीं कामें.

४७. (१) पोलीस अमलदाराचीं हुद्याचीं कामें.

(२) लोकांच्या जमण्याच्या जागांत शिरण्याचा अधिकार.

४८. लोकांच्या संबंधाचीं पोलीस अमलदारांचीं कामें.

४९. (अ) पोलिसानें रस्त्यांतल्या रहदारीचें वगैरे नियमन करणें; आणि

(ब) रस्त्यांत आणि इतर सार्वजनिक जागांत बंदोबस्त ठेवणें; आणि

(क) सार्वजनिक जागांत जाण्यायेण्याचें नियमन करणें.

५०. कलम ४० अन्वयें केलेले हुकुम बजाविणें.

५१. कलम ४१ अगर कलम ४२ अन्वयें केलेले हुकुम मानिले जातील अशी पोलिसानें तजवीज करावी.

५२. बेवारसी माल पोलिसानें ताब्यांत घ्यावा.

५३. अशा मालाची माजिस्ट्रेटानें व्यवस्था करणें.

५४. लवकर नासणारा माल तावडतोब विकण्याचा अधिकार.

कलमें.

### बाब ६ वी. अपराध व शिक्षा.

५५. रस्त्यांतल्या विवक्षित अपराधांबद्दल व पीडांबद्दल शिक्षा.—

(अ) अंधाऱ्या रात्रीं दिव्याशिवाय गाडी हांकणें;

(ब) रस्त्यासंबंधीं नियमाकडे दुर्लक्ष करणें.

(क) अपुरी राखण ठेवलेलें [illegible] वगैरे रस्त्यावर ठेवणें;

(ड) जनावरांकडून अडथळा अगर नुकसान कराविणें;

(इ) कोणतेंहि जनावर भाड्याकरितां, अगर विकावयाकरितां वगैरे रस्त्यावर ठेवणें;

(फ) रस्त्यांत अडथळा करणें;

(ग) पायरस्त्यांत अडथळा करणें;

(ह) सोंगांचे गानवादनाचे अगर इतर प्रकारचे तमाशे रस्त्यांत करणें;

(ज) सार्वजनिक रस्त्यांवर अगर रस्त्यांजवळ त्रासदायक कृत्यें करणें;

(के) घोडे मोकळे सोडणें आणि मुसकें न घातलेले उग्र कुत्रे मोकळे राहूं देणें;

(ल) स्नानाकरितां अगर धुण्याकरितां राखून न ठेवलेल्या जागीं स्नान करणें अगर धुणें;

(म) सार्वजनिक विहिरींतील वगैरे पाणी खराब करणें;

(न) आंघोळ करणाऱ्यांस अडचण करणें;

(ओ) लोकांसमक्ष असभ्य वर्तन;

(प) दारू पिऊन धुंद होणें;

(क्य) शांततेचा भंग व्हावा अशा इराद्यानें गैरवर्तन करणें.

(र) भीक मागणें आणि किळसआणणारे रोग उघडे करून दाखविणें.

५६. जनावरास क्रूरपणा केल्याबद्दल शिक्षा.

५७. पोलिसानें त्रासदायक रीतीनें झाडा घेतल्याबद्दल व धरल्याबद्दल शिक्षा.

५८. पकडलेल्या मनुष्यास पाठविण्यांत त्रासदायक विलंब झाला असतां शिक्षा.

५९. कलम ३७ खालल्या कानू अगर कलम ४९ खालचे हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

कलमें.

६०. कलम ३८ अन्वयें केलेल्या कानू वगैरे मोडल्याबद्दल शिक्षा.

६१. कलम ३९ खालीं केलेला हुकुम मानण्यास चुकल्याबद्दल शिक्षा.

६२. कलमें ४०, ४३, व ४४ यां खालच्या कानु अगर हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

६३. कलम ४१ या खालचा नियम मोडल्याबद्दल शिक्षा.

६४. कलम ४२ अन्वयें केलेला हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

६५. कलम ५० अन्वयें केलेल्या हुकुमास विरोध केल्याबद्दल अगर तो न मानिल्याबद्दल शिक्षा.

६६. अपराधी जेव्हां कान्स्टेबलाच्या वरच्या दरजाचा पोलीस अमलदार असेल, तेव्हां इन्साफाचा अधिकार कोणाकडे.

६७. ह्या आक्टाविरुद्ध विशिष्ट अपराधाबद्दल फिर्याद करणें पोलिसाच्या नजरेवर आहे.

६८. इतर कायद्यांखालच्या अपराधांबद्दल फिर्याद करण्यास ह्या आक्टावरून बाध येत नाहीं.

---

### बाब ७ वी.

#### किरकोळ.

६९. पोलीस अमलदारांस आदा करावयाच्या इनामांची वगैरे व्यवस्था.

७०. जिल्हा माजिस्ट्रेटाचा गांवअमलदारांवरचा अधिकार डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडे सोंपून देण्याचा अख्त्यार आहे.

७१. (१) पोलिसाच्या इमारतींवर कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें कर बसवूं नये.

(२) पोलिसाकरितां जागेची सोय करण्याबद्दल म्युनिसिपालिट्यांस हुकुम करण्याचा अख्त्यार आहे.

७२. (१) फिर्यादी व दावे यांच्या मुदतीबद्दल ठराव.

(२) कित्येक प्रसंगीं दावे काढून टाकावे.

७३ सन १८८८ चा पोलिस आक्ट याचा बचाव.

---

परिशिष्ट अ.

परिशिष्ट ब.

## सन १८८९ चा [ मुंबईचा ] मसुदा नंबर ३.

**मुंबई इलाक्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसांचें नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.**

मुंबई इलाक्यांतील डिस्ट्रिक्ट पोलिसांचें नियमन करण्याबाबदचा कायदा सुधारणें ज्या अर्थी योग्य आहे, त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

### बाब १ ली.—प्रथमारंभींचे नियम.

१. ह्या आक्टास "सन १८८९ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट" असें ह्मणावें. लहान सरनामा.

(१) तो, सिंध, मुंबई शहर, एडन व त्याचीं ताबेदार संस्थानें आणि पेरिम शिवायकरून सगळ्या मुंबई इलाक्यास लागू आहे असें समजावें. व्याप्ति.

(२) तो, परिशिष्टांसहित सगळा अगर त्याचा कोणताहि भाग, गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून, सिंध प्रांतास अगर एडन व त्याचीं ताबेदार संस्थानें आणि पेरिम यांस लागू करण्याचा अख्त्यार आहे. सिंध, एडन व त्याचीं ताबेदार संस्थानें आणि पेरिम यांस लागू करणें.

२. कलम १, पोट-कलम (१), यांतील ठराव लागू राहून, परिशिष्ट अ यांत नमूद केलेले कायदे, त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या आसनांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर रद्द केले आहेत; परंतु त्या कायद्यांपैकीं कोणत्याहि कायद्याअन्वयें केलेली कोणतीहि गोष्ट ह्या ठरावावरून रद्द होते असें समजूं नये. कायदे रद्द केले आहेत.

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या कोणत्याहि कायद्यांत, ह्या आक्टावरून रद्द झालेल्या कोणत्याहि कायद्याचे दिलेले सर्व हवाले ह्या आक्टाच्या मिळत्या भागावर दिले आहेत असें समजावें.

अशा कोणत्याहि कायद्याअन्वयें केलेल्या सर्व कानू, हुकुम व नेमणुका आणि दिलेले सर्व अधिकार व दाखले, हीं कर्से, त्यांचा ह्या आक्टाशीं मेळ बसेल तेथवर, ह्या आक्टाअन्वयें झालीं आहेत असें समजावें.

व्याख्या.

३. ह्या आक्टांत, विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर,—

"इन्स्पेक्टर जनरल," "डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट," "आसिस्टंट सुपरिंटेंडेंट."

(अ) "इन्स्पेक्टर जनरल," "डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट" व "असिस्टंट सुपरिंटेंडेंट" या संज्ञांचा अर्थ, अनुक्रमें, ह्या आक्टाअन्वयें नेमिलेला इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस व असिस्टंट व सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस असा समजावा;

"पोलीस अमलदार."

(ब) "पोलीस अमलदार" ह्मणजे ह्या आक्टाअन्वयें नेमिलेला पोलीस फौजेंपैकीं कोणताहि मनुष्य, असें समजावें;

"कान्स्टेबल."

(क) "कान्स्टेबल" ह्मणजे कनिष्ठ दर्जाचा पोलीस अमलदार असें समजावें;

"जिल्हा."

(ड) "जिल्हा" ह्मणजे सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या कारणांसाठीं जिल्हा ह्मणून ठरविलेला मुलुकाचा भाग, असें समजावें;

"मार्ग."

(इ) "मार्ग" ह्या शब्दांत, कोणत्याहि हमरस्त्याचा आणि कोणत्याहि बांधावरच्या, पुलावरच्या, सेतूवरच्या, कमानीवरच्या, कीवरच्या अगर धक्क्यावरच्या रस्त्याचा, आणि ज्यांत लोकांचा प्रवेश होतो असा कोणताहि रस्ता, गल्ली, पायरस्ता, चवाठा, चौक, अळी अगर वाट, (मग हीं रहदारीचीं असोत अगर नसोत,) यांचा समावेश होतो असें समजावें;

"गुरें."

(फ) "गुरें" या शब्दांत, हत्ती, उंट, घोडे, गाढवें, खेचरें, मेंढरें, शेळ्या व डुकरें यांचा समावेश होतो असें समजावें.

क्रिमिनल प्रोसीजर कोडांत व्याख्या केलेले शब्द व संज्ञा.

(ग) सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडांत ज्या शब्दांचा व संज्ञांचा व्याख्येनें अर्थ दिला आहे, त्या शब्दांचा व संज्ञांचा तोच अर्थ या आक्टांत लागू आहे असें समजावें.

---

## भाग २ रा,—पोलिसाची रचना.

### सामान्य.

दरेक जिल्ह्यांत पोलीस फौज ठेविली जाईल.

४. मुंबई इलाक्यांतील ह्या आक्ट लागू असलेल्या प्रत्येक जिल्ह्यांत, सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या निर्बंधास पात्र राहून, एक पोलीस फौज स्थापण्याचा व तिचा खर्च चालविण्याचा अखत्यार आहे; त्या पोलीस फौजेच्या भिरनिराळ्या दर्जांतील लोकांची संख्या, तिची रचना, तिचीं कामें, तिचे हक्क व अधिकार हीं यापुढें ठरविल्याप्रमाणें व निर्दिष्ट केल्याप्रमाणें असतील आणि, सदरीं सांगितलेले अधिकारी वेळोवेळीं फर्मावितील व मंजूर करितील त्याप्रमाणें त्या फौजेस पगार व नेमणुका मिळत जातील.

इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस याची नेमणूक व त्याचा अधिकार.

५. (१) मुंबई इलाक्याच्या ज्या भागास ह्या आक्ट लागू आहे त्या प्रत्येक भागाच्या पोलीस फौजेवर अधिकार चालविण्यासाठीं, आणि तिची देखरेख ठेवण्यासाठीं

गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं एक इन्स्पेक्टर जनरल आफ पोलीस नेमिला पाहिजे; त्या इन्स्पेक्टर जनरलास, ह्या आक्टाचे ठराव आणि या संबंधाच्या सरकारच्या कानू व हुकुम लागू राहून, यापुढें ठरविल्याप्रमाणें कामें करावीं लागतील, अधिकार चालवावे लागतील व जबाबदारी धारण करावी लागेल.

(२) इन्स्पेक्टर जनरलास त्याच्या हुद्यावरून सस्पेंड करण्याचा अगर बर्तर्फ करण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अधिकार आहे. — त्याला सस्पेंड अगर बर्तर्फ करणें.

६. गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, प्रत्येक जिल्ह्यासाठीं एक सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस आणि योग्य वाटतील तितके आसिस्टंट सुपरिंटेंडेंट नेमण्याचा, आणि त्या अमलदारांपैकीं योग्य वाटेल त्या अमलदारास बर्तर्फ करण्याचा, सस्पेंड करण्याचा, कमी पगारावर घालण्याचा, काढून टाकण्याचा अगर बदलण्याचा अधिकार आहे. — डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट व असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांची नेमणूक.

७. प्रत्येक कमिशनरास त्याच्या निबंधाखालच्या सर्व जिल्ह्यांत, आणि इन्स्पेक्टर जनरल आफ् पोलीस यास सगळ्या इलाक्यांत पाहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटाचे अधिकार असतील; परंतु ते अधिकार, त्यांनीं, स्थानिक सरकार वेळोवेळीं जी मर्यादा ठरवील त्या मर्यादेबरहुकुम चालविले पाहिजेत. — कमिशनरांस व इन्स्पेक्टरांस माजिस्ट्रेटी अधिकार असतील. त अधिकार त्यांनीं सरकारच्या हुकुमांस अनुसरून चालविले पाहिजेत.

८. इन्स्पेक्टर जनरल यास, गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमास पात्र राहून, प्रत्येक जिल्ह्याकरितां जरूर असतील तितके इन्स्पेक्टर नेमण्याचा अधिकार आहे. — इन्स्पेक्टरांची नेमणूक.

९. इन्स्पेक्टरच्या खालच्या दर्जाचे पोलीस अमलदार दरेक जिल्ह्यांत डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडून नेमण्यांत येतील; आणि ते, मंजुरी संबंधानें, हुद्यांच्या संबंधानें, परस्परांमधल्या संबंधांच्या संबंधानें व नोकरीच्या अटींच्या संबंधानें त्या त्या वेळीं चालू असलेल्या कायद्यास अनुसरून सरकार वेळोवेळीं ज्या कानू करील, त्यांस पात्र आहेत असें समजावें. — इन्स्पेक्टरच्या दर्जाखालच्या पोलीस अमलदारांची नेमणूक.

१०. इन्स्पेक्टरांची नेमणूक झाल्यावर त्यास इन्स्पेक्टर जनरलाकडून नेमणुकीचा दाखला मिळेल; त्या दाखल्यांत त्याचा कोम, नांव, वय, जात अगर धर्म, आणि पूर्वी त्याची कांहीं नोकरी झालेली असल्यास ती, यांसंबंधानें माहिती असेल. — इन्स्पेक्टरांस नेमणुकीचा दाखला दिला पाहिजे.

११. (१) इन्स्पेक्टरच्या दर्जाखालच्या प्रत्येक पोलीस अमलदारास, त्याचें नांव पटांत दाखल केल्यावर, परिशिष्ट ब यांत दिलेल्या नमुन्याबरहुकुम व त्याचें नांव पहिल्यानें ज्या जिल्ह्यांत पटांत दाखल केलें जाईल त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाच्या शिक्यानिशीं एक दाखला देण्यांत येईल. — इन्स्पेक्टरच्या दर्जाखालच्या पोलीस अमलदारांस हुद्याचे दाखले द्यावे.

(२) सदर्हू प्रकारचा दाखला मिळालेल्या मनुष्यास त्या दाखल्यावरून पोलीस अमलदाराचे अधिकार, कामें, हक्क, व जबाबदाऱ्या प्राप्त होतात असें समजावें. — सदर्हू प्रकारचे दाखले धारण करणाऱ्यांचे अधिकार.

(३) अ. सदर्हू प्रकारचे दाखल्यांत निर्दिष्ट केलेल्या मनुष्याचा व पोलिसाचा कोणत्याहि कारणावरून संबंध तुटेल तेव्हां तो दाखला रद्दबातल होतो असें समजावें. — असे दाखले रद्दबातल केव्हां होतात तें.

ब. सदर्हू प्रकारच्या दाखल्यावरून कोणत्याहि मनुष्यास प्राप्त झालेले अधिकार, कामें व हक्क, तो मनुष्य हुद्यावरून सस्पेंड केला जाईल त्या मुदतींत कांहीं वेळपर्यंत महकूब राहातील. असा मनुष्य, याप्रमाणें सस्पेंड झाल्यावरून पोलीस अमलदार नाहीं असें समजूं नये; परंतु तो सस्पेंड न झाल्याप्रमाणेंच त्याजवर जबाबदाऱ्या राहतील व तो आपल्या अधिकाऱ्यांच्या निबंधांत राहील. — दाखले धारण करणारांचे अधिकार वगैरे कांहीं वेळपर्यंत बंद ठेवणें.

१२. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें, इन्स्पेक्टर जनरलाच्या हुकुमांस पात्र राहून, हत्यारें, कवाईत, व्यायाम, मनुष्यांवर व घडत असलेल्या गोष्टींवर नजर ठेवणें, परस्परांचा संबंध, कामें वाटणें, कायद्यांचा, हुकुमांचा आणि काम चालविण्याच्या रीतीं — डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाचे सामान्य अधिकार.

चा अभ्यास या संबंधाच्या आणि आपल्या जिल्ह्यांतील पोलीस फौजेस आपलें काम करतांना बजावणीच्या बाबतींत ज्या गोष्टी उपयोगी पडत असतील त्या संबंधाच्या सर्व बाबतींत हुकूम करून त्यांचें नियमन केलें पाहिजे.

जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाचा निर्बंध.

१३. (१) कोणत्याहि जिल्ह्याचा डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट व तेथील पोलीस फौज हीं, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाचे हुकुमांत व निर्बंधांत असतील.

सरकारच्या कानूंस व हुकुमांस व कामिशनराच्या कायदेशीर हुकुमास पात्र राहील.

(२) गेल्या शेवटल्या पोट-कलमाअन्वयें अधिकार चालवितांना, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें, गव्हर्नर इन् कौन्सिल हे वेळोवेळीं ह्या कारणासाठीं ठरवितील त्या कानूंबरहुकूम व हुकुमांबरहुकूम वागलें पाहिजे, आणि तो कामिशनराच्या कायदेशीर हुकुमांस पात्र राहील.

पोट-कलम (१) यांच्या हेतूंस इन्स्पेक्टर जनरल यानें पुष्टी आणिली पाहिजे.

(३) इन्स्पेक्टर जनरल यांनीं ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंत व हुकुमांत पोट-कलम (१) यांतील हेतूंस पुष्टी आणिली पाहिजे.

जिल्हा माजिस्ट्रेटानें मागितल्याबरोबर इन्स्पेक्टर जनरलानें कोणत्याहि जिल्ह्यास जास्त पोलीस फौज दिली पाहिजे.

१४. आपल्या जिल्ह्याकडून मिळणार नाहीं अशा पोलीस फौजेची निकडीची गरज आतां लागणार आहे किंवा अमुक वेळीं लागेल असा कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाचा अभिप्राय झाला असता त्यानें त्याबद्दल इन्स्पेक्टर जनरलास कळविलें पाहिजे, आणि इन्स्पेक्टर जनरलानें करवेल तितकी जिल्हा माजिस्ट्रेटाची मागणी मान्य केली पाहिजे.

जिल्हा माजिस्ट्रेटास डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडून रिपोर्ट मागविण्याचा अखत्यार आहे.

१५. जिल्हा माजिस्ट्रेटास, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडून, गुन्ह्यांसंबंधानें, गुन्ह्यांनीं उपजीविका करणाऱ्या लोकांच्या स्थितीच्या संबंधानें, अव्यवस्था न होऊं देण्याच्या संबंधानें, मेळे व तमाशे यांचें नियमन करण्याच्या संबंधानें, पोलीस फौज वांटून देण्याच्या संबंधानें, जादा साधनांचा उपयोग करण्याच्या संबंधानें, आणि पोलीस फौजेवरचा आपला निर्बंध वाढविण्याच्या व व्यवस्था राखण्याच्या इतर सर्व बाबतींच्या संबंधानें कोणत्याहि गोष्टीविषयीं विशेष अगर सामान्य रिपोर्ट मागविण्याचा अखत्यार आहे

आपल्या जिल्ह्याच्या पोलीस फौजेवर देखरेख करण्याचे जिल्हा माजिस्ट्रेटाचे सामान्य अधिकार.

१६. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाचा ताबेदार असा कोणताहि अमलदार आपल्या ठिकाणास अगर आपल्या स्वतःच्या कर्तव्यांस अगदीं अयोग्य अगर नालायक आहे असें जिल्हा माजिस्ट्रेटास आढळून आल्यास, त्या ताबेदार अमलदाराचे जागीं दुसरा नेमण्याबद्दल त्या डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास हुकूम करण्याचा त्यास अखत्यार आहे; आणि तो अमलदार त्या डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें नेमिलेला असल्यास त्या सुपरिंटेंडेंटानें त्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमाप्रमाणें वागवेल तितकें वागलें पाहिजे; आणि, तो अमलदार इन्स्पेक्टर जनरलानें नेमिलेला असल्यास डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें ती हकीकत त्यास कळविली पाहिजे; आणि त्या इन्स्पेक्टर जनरलानें या संबंधानें तजवीज करितांना त्या जिल्हा माजिस्ट्रेटाच्या अभिप्रायाचा लक्षपूर्वक विचार करून, जी तजवीज केली जाईल तिजबद्दल त्यास कळविलें पाहिजे.

पोलीस फौजेस कामास लावण्याच्या संबंधानें हुकूम करण्याचा कमिशनराचा अधिकार.

१७. (१) कोणत्याहि कमिशनरास, आपल्या हुकुमतींतल्या भागांतील कोणत्याहि जिल्ह्यांतल्या पोलीस फौजेस कामास लावण्याच्या संबंधानें, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास जो हुकूम करितां येतो, तो हुकूम करण्याचा आणि शिवाय, निकडीच्या प्रसंगीं आपल्या भागांत एका जागीं कामावर असलेला अशा पोलीस फौजेचा कोणताहि अंश त्या भागाच्या दुसऱ्या कोणत्याहि जागीं कामावर पाठविण्याबद्दल फर्माविण्याचा अखत्यार आहे.

असा हुकूम साधारणतः जिल्हा माजिस्ट्रेटास करून इन्स्पेक्टर जनरलास कळवावा.

(२) पोट-कलम (१) अन्वयें केलेला कोणताहि हुकूम, तो ज्या जिल्ह्याच्या संबंधाचा असेल, त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटाकडे पाठविला पाहिजे. परंतु, जरूर असेल तेव्हां, तो हुकूम परभारें डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडे पाठविण्याचा अखत्यार आहे; मात्र अशा प्रसंगीं तो त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास कळविला पाहिजे.

परंतु अशा प्रत्येक बाबतींत तो हुकुम कमिशनरानें इन्स्पेक्टर जनरल यास कळविला पाहिजे.

आपल्या भागांतील पोलिसाचीं व्यंगें इन्स्पेक्टर जनरलाच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याचा कमिशनरास अख्त्यार आहे.

१८. कोणत्याहि कमिशनराच्या दृष्टोत्पत्तीस आलेल्या गोष्टींपैकीं ज्या गोष्टी इन्स्पेक्टर जनरलाच्या अधिकारांतल्या असतील त्या गोष्टींच्या संबंधानें, त्या कमिशनरास, आपल्या अधिकारांतल्या भागापैकीं कोणत्याहि जागेंतल्या पोलिसाच्या व्यवस्थेच्या संबंधाचीं अगर त्यांतल्या लोकांच्या योग्यतेच्या संबंधाचीं व्यंगें इन्स्पेक्टर जनरलाच्या दृष्टोत्पत्तीस आणून देण्याचा अख्त्यार आहे. अशा कोणत्याहि सूचनेचा लक्षपूर्वक विचार करून, दृष्टोत्पत्तीस आणिलेलीं व्यंगें सुधारतां येतील तितकीं सुधारणें आणि तकरारीचीं कारणें काढून टाकतां येतील तितकीं काढून टाकणें हें इन्स्पेक्टर जनरलचें काम आहे असें समजावें. आणि त्यानें या बाबतींत आपण केलेली तजवीज कमिशनरास कळविली पाहिजे.

गुन्ह्यांची स्थिति वगैरे बाबतींत रिपोर्ट करण्यासाठीं जिल्हा माजिस्ट्रेटास हुकुम करण्याचा कमिशनरास अख्त्यार आहे.

१९. कोणत्याहि कमिशनरास, आपल्या अधिकाराखालच्या भागाचा कारभार चांगल्या रीतीनें चालविण्यासाठीं अवश्य वाटतील तसे कोणत्याहि जिल्ह्यांतील गुन्ह्याच्या स्थितीच्या संबंधाचे, त्या जिल्ह्यांतील पोलिसाच्या वाटणीच्या संबंधाचे आणि गुन्ह्याचा व अव्यवस्थेचा बंदोबस्त करण्यासाठीं केलेल्या व्यवस्थेच्या संबंधाचे रिपोर्ट व यासंबंधीं माहिती, हीं, पुरविण्याबद्दल त्या जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास हुकुम करण्याचा, आणि त्या संबंधानें कायद्यास अनुरूप असे हुकुम काढण्याचा, अख्त्यार आहे.

पोलिसाच्या जमाखर्चाच्या सर्व बाबतींबद्दल चौकशी करण्याचा कमिशनरास अख्त्यार आहे.

२०. कोणत्याहि कमिशनरास, आपल्या अधिकाराखालच्या भागांतील पोलिसाच्या संबंधाच्या जमाखर्चाच्या सर्व बाबतींत चौकशी करण्याचा अधिकार आहे; आणि, त्या जमाखर्चाशीं संबंध असलेल्या सर्व मनुष्यांनीं अशी चौकशी करण्याच्या प्रसंगीं, त्या कमिशनरास वाजवी मदत आणि सवड दिली पाहिजे.

## स्पेशल.

स्पेशल पोलीस अमलदार नेमणें.

२१. (१) कोणत्याहि गैरकायद्याच्या मंडळीचा जमाव, अगर कोणताहि दंगा अगर स्वस्थतेचा इतर प्रकारचा भंग झाला आहे अगर होईल अशी वाजवी रीतीनें भीति वाटत आहे असें, आणि, उपयोगीं पडण्यासारखी पोलीस फौज, ज्या स्थानिक प्रदेशांत तसा जमाव, दंगा अगर इतर प्रकारचा स्वस्थतेचा भंग झाला असेल अगर होण्याची भीति असेल त्या स्थानिक क्षेत्रांत स्वस्थता राखण्यासाठीं, आणि रहिवाशाचें व मालमिळकतीचें रक्षण करण्यासाठीं पुरेशी नाहीं असें कोणत्याहि शहरांत अगर जागेंत हुकुमत असलेल्या दुसऱ्या वर्गाच्या अगर त्याहून श्रेष्ठ दर्जाच्या कोणत्याहि माजिस्ट्रेटाच्या दृष्टोत्पत्तीस आल्यास त्यास, चीफ कान्स्टेबलापेक्षां दर्जानें कमीं नाहीं अशा कोणत्याहि पोलीस अमलदारानें अर्ज केला असतां, स्वदस्तुरी व आपल्या हुद्याच्या शिक्क्यानें मोहोर केलेला असा लेखी हुकुम देऊन, स्पेशल पोलीस अमलदार होण्यास योग्य व तयार असतील अशा लोकांपैकीं आपणास योग्य वाटतील तितक्या लोकांना आपणास जरूर वाटेल त्या काळपर्यंत व विवक्षित हद्दीच्या आंत स्पेशल पोलीस अमलदार नेमण्याचा अख्त्यार आहे.

स्पेशल पोलीस अमदारांचे अधिकार व जबाबदाऱ्या.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें नेमिलेल्या प्रत्येक स्पेशल पोलीस अमलदारास साधारण पोलीस अमलदाराचेच अधिकार, कामें, हक्क व सुटी असतील त्याचींच कामें करावीं लागून त्याच्या जबाबदाऱ्या धारण कराव्या लागतील, व तो त्याच अधिकाऱ्यांच्या निर्बंधाखालीं राहील; परंतु त्यास कलम ११ अन्वयें हुद्याचा दाखला देणें जरूर पडणार नाहीं.

## जादा व प्युनिटिव.

खासगी मनुष्यांच्या मागणीवरून जास्त पोलीस कामावर ठेवणें.

२२. (१) जिल्हा माजिस्ट्रेटाच्या सामान्य निर्बंधास पात्र राहून, कोणत्याहि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, जिल्ह्यांतील कोणत्याहि ठिकाणीं स्वस्थता राखण्यासाठीं

किंवा पोलिसचीं इतर कामें करण्यासाठीं जादा पोलीस पाठविणें जरूर आहे असें दाखवून तशा जादा पोलिसासाठीं कोणत्याहि मनुष्यानें अर्जी केली असतां, त्या ठिकाणीं जास्त पोलीस पाठविण्याचा अख्त्यार आहे.

(२) सदर्हूप्रमाणें पाठविलेल्या जादा पोलिसाचा खर्च, अर्जी करणाऱ्या मनुष्यानें दिला पाहिजे. परंतु त्या पोलिसावर पोलीस अधिकाऱ्यांचा हुकुम चालून जिल्हा माजिस्ट्रेटास अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास योग्य दिसेल तोंपर्यंत तें पोलीस कामावर ठेविलें जाईल.

(३) मात्र इतकेंच कीं, ज्या मनुष्याचे अर्जीवरून तें जादा पोलीस कामावर ठेविलें असेल त्या मनुष्यानें कोणत्याहि वेळीं त्या जिल्ह्याचे माजिस्ट्रेटास अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास तें पोलिस काढून नेण्याची लेखी सूचना केली तर, ती सूचना पावल्याच्या तारिखेपासून एका महिन्याहून जास्त नाहीं अशी जी मुदत सदरील जिल्हा माजिस्ट्रेट अगर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ठरवील ती पुरी झाली ह्मणजे त्या जादा पोलिसाच्या खर्चाचा भार त्या मनुष्यावरून उतरतो असें समजावें.

मोठालीं कामें बांधीत असलेल्या मनुष्यांच्या खर्चानें त्या कामांजवळ जादा पोलीस ठेवणें.

२३. (१) आपल्या जिल्ह्यांतील कोणत्याहि जागीं बांधीत असलेल्या अगर चालू असलेल्या कोणत्याहि रेलवेवर, कालव्यावर अगर इतर सार्वजनिक कामावर अगर कारखान्यांत अगर कारखान्यावर अगर व्यापाराचे इतर कामांत अगर कामावर लाविलेल्या मनुष्यांचे वर्तणुकीवरून किंवा ते अमुक प्रकारची वर्तणूक करितील असें वाजवी रीतीनें वाटल्यावरून त्या जागीं जादा पोलीस ठेवणें अवश्यक आहे असें कोणत्याहि जिल्हा माजिस्ट्रेटास वाटल्यास, त्यास, सरकारची मंजुरी घेऊन, आपणांस योग्य वाटेल तितकें जादा पोलीस त्या ठिकाणीं पाठविण्याचा आणि तें पोलीस जितके दिवस तेथें कामावर ठेवणें अवश्यक आहे असें त्यास वाटेल तितके दिवस तें तेथें ठेवण्याचा अख्त्यार आहे.

(२) सदर्हू प्रकारचें जादा पोलीस कामावर ठेवणें तें, तें काम, कारखाना अगर व्यापाराचें काम जो मनुष्य बांधीत असेल अगर चालवीत असेल त्याच्या खर्चानें ठेवलें पाहिजे आणि त्या मनुष्यानें, तो खर्च, त्या जिल्ह्याचा माजिस्ट्रेट सरकारच्या मंजुरीनिशीं वेळोवेळीं ठरवील त्या दरांनीं व त्या वेळीं दिला पाहिजे.

प्युनिटिव पोलीस ठेवणें.

२४. (१) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन ज्या कोणत्याहि स्थानिक प्रदेशांत अस्वस्थता अगर भय उत्पन्न झालें आहे असें त्यांस वाटेल अगर ज्या प्रदेशांतल्या रहिवाशांच्या अगर त्यांपैकीं कोणत्याहि एकाद्या विवक्षित भागाच्या वर्तणुकेवरून पोलिसाची संख्या कांहीं काळपर्यंत वाढविणें योग्य आहे असा त्यांचा अभिप्राय झाला असेल त्या प्रदेशांत आपणांस वाटेल तितक्या मुदतापर्यंत वेळोवेळीं जादा पोलीस ठेवण्याबद्दल हुकुम करण्याचा अख्त्यार आहे.

(२) अशा जादा पोलिसाचा सर्व खर्च अगर त्याचा कोणताहि भाग, सरकारानें तसा हुकुम केला तर, तो जाहिरनामा ज्या स्थानिक प्रदेशास लागू असेल त्या प्रदेशांतील साधारणतः सर्व रहिवाशांवर अगर त्यांपैकीं कोणत्याहि एकाद्या विवक्षित भागावर कर बसवून त्याच्या उत्पन्नांतून भागविला पाहिजे.

(३) म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट खेरीजकरून इतर ठिकाणीं सदर्हू प्रकारचा कर कलेक्टरानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें आकारला पाहिजे. तसा कर ज्या स्थानिक प्रदेशांत बसविलेला असेल तो म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास त्या खर्चाची रक्कम तेथील म्युनिसिपालिटीनें आपल्या म्युनिसिपल फंडांतून देऊन, पोट-कलम

(२) अन्वयें सरकार जो हुकुम करील त्यावरहुकुम, तो कर आपण आकारला पाहिजे.

२५. (१) कोणतेहि म्युनिसिपालिटीनें गेल्या शेवटल्या कलमाखालीं अगर ह्या आक्टाच्या दुसऱ्या कोणत्याहि ठरावाअन्वयें आकारलेला प्रत्येक कर तिनें म्युनिसिपल कराप्रमाणेंच वसूल केला पाहिजे. गेल्या शेवटल्या तीन कलमांखालचे कर व खर्च वसूल करणें.

(२) कलेक्टरानें सदरील कलमाअन्वयें आकारलेला प्रत्येक कर, आणि कलम २२ अगर २३ अन्वयें ठेवलेल्या जादा पोलिसाबद्दल द्यावयाची प्रत्येक रकम, हीं देण्याची वेळ होतांच दिलीं नाहींत तर, तीं, जमीनमहसुलाची बाकी, ती येणें असलेल्या मनुष्याकडून ज्याप्रमाणें वसूल करण्यांत येते, त्याप्रमाणें कलेक्टरानें वसूल केलीं पाहिजेत.

---

## बाब ३ री.

### पोलीस फौजेचें नियमन करणें, तिजवर निर्बंध ठेवणें व तिला कवाईत वगैरे शिकविणें.

२६. सरकारच्या हुकुमांस पात्र राहून, इन्स्पेक्टर जनरल यास, ह्या आक्टाशीं अगर त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि इतर कायद्याशीं मेळ बसतील अशा खालीं लिहिलेल्या बाबतींत कानू अगर हुकुम वेळोवेळीं करण्याचा अख्त्यार आहे:— पोलिसाचा कारभार चालविण्यासाठीं कानू करणें.

(अ) पोलीसाच्या रचनेच्या, वर्गीकरणाच्या व त्यांस कवाईत वगैरे शिकविण्याच्या बाबतींत;

(ब) इन्स्पेक्टर जनरलाच्या हाताखालच्या लोकांनीं पोलिसाची तपासणी करण्याचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(क) पोलिसास द्यावयाचीं जीं हत्यारें, सामान, कपडे व इतर अवश्य जिन्नस त्यांचा प्रकार व परिमाण ठरविण्याच्या बाबतींत;

(ड) पोलीसच्या कारभाराशीं संबंध असलेल्या कोणत्याहि कारणासाठीं कोणताहि पोलीस फंड उभारण्याच्या, त्याची व्यवस्था ठेवण्याच्या व त्याचे नियमन करण्याच्या बाबतींत;

(इ) पोलीसाची वांटणी, त्याचें स्थलांतर व त्याचें स्थान यांचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(फ) निरनिराळ्या दर्जांच्या पोलीस अमलदारांच्या कर्तव्यांचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(ग) पोलिसानें बातमी व माहिती काढणें व ती कळविणें यांचें नियमन करण्याच्या बाबतींत;

(ह) साधारणतः, पोलिसास आपल्या कामांत तरबेज करण्याच्या व त्यांच्या कामांचा दुरुपयोग अगर अनास्था न होऊं देण्याच्या बाबतींत.

२७. सरकारच्या कानूंस व हुकुमांस पात्र राहून, इनस्पेक्टर जनरल आफ् पोलीस यास, आपल्या ताबेदारांकडून, गुन्ह्यांचा बंदोबस्त, व्यवस्था राखणें, व त्यांच्या कामांची बजावणी या संबंधाच्या विषयांबद्दल देतां येतील तितकीं पत्रकें, रिपोर्ट व हकीकती मागण्याचा अख्त्यार आहे. सदरील कारणांसाठीं अगर आपणास मिळालेल्या इन्स्पेक्टर जनरलास पत्रकें वगैरे मागविण्याचा अख्त्यार आहे.

माहितीवरून इनस्पेक्टर जनरल आफ् पोलीस जे कोणतेहि सामान्य हुकुम करील ते त्यानें जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास व कमिशनरास कळविले पाहिजेत.

काम करण्यात निष्काळजी-पणा वगैरे याबद्दल पोलीस खात्याच्या द्वारें पोलीस अमलदारास शिक्षा.

२८. (१) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस अगर पोटकलम (३) अन्वयें या कारणासाठीं अधिकार दिलेल्या कोणत्याहि अमदालरास, जो कोणताहि पोलिस अमलदार आपले काम करण्यांत क्रूर, हेकेखोर, सुस्त अगर निष्काळजी किंवा आपलें काम करण्यास अयोग्य आहेसा वाटेल त्यास सस्पेंड करण्याचा, कमी पगारावर घालण्याचा अगर बर्तर्फ करण्याचा, आणि असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या दर्जाखालचा जो कोणताहि पोलीस अमलदार, त्यास सस्पेंड अगर बर्तर्फ करणें जरूर नाहीं अशा नियमभंगाबद्दल अगर गैर वर्तणुकेबद्दल अपराधी असेल, त्यास, किंवा जो आपल्या कोणत्याहि कृत्यावरून आपलें काम करण्यास अयोग्य ठरतो त्यास त्याच्या एका महिन्याच्या पगाराहून जास्त नाहीं इतका दंड करण्याचा, अख्त्यार आहे.

ह्या कलमांतील शिक्षा, कलमें ३५,५७ अगर ५८ या खालच्या गुन्हेगाऱ्यांशिवाय आणखी आहे.

(२) कोणत्याहि पोलीस अमलदारास ह्या कलमाअन्वयें केलेली कोणतीहि शिक्षा, तो अमलदार या आक्टाचें कलम ३६, ५७ अगर ५८ याअन्वयें अगर अमलांत असलेल्या दुसऱ्या कोणत्याहि कायद्याअन्वयें ज्या गुन्हेगारीस पात्र असेल त्या गुन्हेगारीशिवाय आणखी आहे असें समजावें.

(३) पोट-कलम (१) अन्वयें कोणत्याहि इन्स्पेक्टरास शिक्षा करण्याचा इन्स्पेक्टर जनरलास अधिकार आहे. आणि, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, त्याच्या हताखालचा जो कोणताहि पोलीस अमलदार इन्स्पेक्टरच्या खालच्या दर्जाचा असेल त्याच्या संबंधानें त्याच प्रकारचा अधिकार आहे. आणि त्याच्या हाताखालच्या कोणत्याहि इन्स्पेक्टराविरुद्ध झालेल्या मोठ्या तकरारींची चौकशी होई व इन्स्पेक्टर जनरल यांजकडून हुकुम येई तोंपर्यंत त्या इन्स्पेक्टरास सस्पेंड करण्याचा त्या सुपरिंटेंडेंटास अधिकार आहे. परंतु ह्या पोट-कलमाअन्वयें दिलेला कोणताहि अधिकार चालविणें तो, नेहमीं, त्या बाबतींत सरकारानें केलेल्या कानूंत व हुकुमांस पात्र राहून चालविला पाहिजे.

शिक्षा करितांना काम कसें चालवावें तें.

२९. जेव्हां कोणताहि अमलदार एकाद्या पोलीस अमलदारास दंड करण्याचा, सस्पेंड करण्याचा, कमी पगावरावर घालण्याचा अगर बर्तर्फ करण्याचा हुकुम करील तेव्हां, त्यानें तो हुकुम त्याच्या कारणांसहित आणि केलेल्या चौकशीच्या टिपणासहित आपल्या जिल्ह्याच्या भाषेत अगर इंग्रजी भाषेत आपल्या सहीनिशीं दफतरांत लेखी दाखल केला अगर करविला पाहिजे.

शिरजोरपणाबद्दल पोलीस खात्याच्या द्वारें शिक्षा.

३०. (१) इन्स्पेक्टर जनरल यांस आणि कोणत्याहि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, आणि कोणत्याहि जिल्ह्याचा कोणताहि भाग स्वाधीन असलेल्या कोणत्याहि असिस्टंट सुपरिंटेंडेंटास, हेड-कान्स्टेबलच्या दर्जाखालचा जो कोणताहि पोलीस अमलदार आपणासमोर फाजील शिरजोरपणा करील अगर जो आपणाशीं उद्धटपणा करील त्यास गार्ड-रूममध्यें तीन दिवसांपेक्षां जास्त नाहींत इतके दिवस कोंडून ठेवण्याचा अख्त्यार आहे.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें कोणत्याहि पोलीस अमलदारास शिक्षा केल्याचा प्रत्येक हुकुम, कलम २९ यांत सांगितल्याप्रमाणें दप्तरीं दाखल केला पाहिजे. आणि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें अगर असिस्टंट सुपरिंटेंडेंटानें केलेल्या अशा प्रत्येक हुकुमाची एक प्रत त्यानें आपल्या लगतच्या वरिष्ठ अमलदाराकडे पाठविली पाहिजे.

पोलीस अमलदार नेहमीं कामावर आहेत असें मानिलें पाहिजे; आणि ते इलाक्याच्या को-

३१. जो कोणताहि पोलीस अमलदार ज्या प्रदेशाकरितां नेमिलेला असेल अगर ज्या प्रदेशांत त्याची कायदेशीर रीतीनें बदली झाली असेल, तो, ह्या आक्टाच्या सर्व कारणांसाठीं त्या प्रदेशांत नेहमीं कामावर असतो असें समजलें जाईल; आणि, इला-

त्याच्या कोणत्याहि एका भागाकरितां नेमिलेला कोणताहि पोलीस अमलदार आणि नेमिलेले कोणतेहि पोलीस अमलदार अगर पोलीस अमलदारांची मंडळी, यांस, सरकारानें अगर इन्स्पेक्टर जनरलानें तसा हुकुम केला तर, इलाख्याच्या ज्या कोणत्याहि इतर भागीं जोपर्यंत त्यांची गरज लागेल त्या भागीं तोंपर्यंत कोणत्याहि वेळीं पोलीसच्या कामावर ठेवण्याचा अख्त्यार आहे.

णत्याहि भागीं कामावर पाठविले जाण्यास पात्र आहेत.

३२. (१) कोणत्याहि पोलीस अमलदारानें व्यापाराचें काम करूं नये, अगर व्यापाराच्या कोणत्याहि कामांत मुख्य ह्मणून अगर मुखत्यार ह्मणून कोणत्याहि रीतीनें संबंध ठेवूं नये.

पोलीस अमलदारानें व्यापार करूं नये.

(२) असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या खालच्या दर्जाच्या कोणत्याहि पोलीस अमलदारानें, इन्स्पेक्टर जनरलाची लेखी परवानगी घेतल्याशिवाय, आपला हुद्दा अगर पोलीस अमलदार या नात्यानें आपलीं कामें यांखेरीज दुसरा कोणताहि हुद्दा धारण करितां कामास नये अगर कोणत्याहि धंद्याचें अगर नोकरीचें काम चालवितां कामास नये.

परवानगी घेतल्यावांचून असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या खालच्या दर्जाच्या पोलीस अमलदारांनीं इतर नोकरी धरूं नये.

(३) पोटकलमें (१) व (२) यांतले मनाईचे ठराव ज्याप्रमाणें पोलीस अमलदार कामावर असतांना त्यास लागू आहेत त्याचप्रमाणें रजेवर अगर सस्पेंड असतांनाहि लागू राहातील.

पोलीस अमलदार रजेवर अगर सस्पेंड केलेला असतांहि हे मनाईचे ठराव लागू राहातील.

३३. (१) असिस्टंट सुपरिंटेंडेंटाच्या खालच्या दर्जाच्या कोणत्याहि पोलीस अमलदारास आपल्या हुद्याचा राजीनामा देणें असल्यास अगर आपल्या हुद्याचीं कामें सोडून द्यावयाचीं असल्यास त्यानें.—

(अ) तसें करण्याच्या आपल्या इराद्याची लेखी नोटीस डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास दिल्यावर दोन महिने लोटत तोंपर्यंत,

(ब) पोलीस अमलदार या नात्यानें सरकारास अगर कोणत्याहि पोलीस फंडास देणें असलेलें सर्व कर्ज फेडल्याशिवाय,

तसें करूं नये; मात्र डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाच्या लेखी परवानगीनिशीं अगर तशी परवानगी देण्यास इन्स्पेक्टर जनरलानें अधिकार दिलेल्या इतर पोलीस अमलदाराच्या लेखी परवानगीनिशीं तसें करण्याचा अख्त्यार आहे.

पोलीस अमलदारानें राजीनामा देण्यास कोणत्या शर्ती लागू आहेत.

(२) मात्र इतकेंच कीं, असा कोणताहि पोलीस अमलदार जर आपण रोगामुळें अगर मानसिक किंवा शारीरिक नालायकतेमुळें पोलिसांत आणखी नोकरी करण्यास अयोग्य असल्याबद्दल सिव्हिल सर्जनच्या सहीचा दाखला हजर करील तर, सदरीं सांगितलेलें कर्ज त्यानें फेड केल्यास अगर फेडण्याबद्दल चांगलें तारण दिल्यास, राजीनामा देण्यास लागणारी लेखी परवानगी त्यास विलंब न लावितां दिली जाईल.

(३) असा कोणताहि अमलदार जर ह्या कलमांतील ठरावांविरुद्ध राजीनामा देईल अगर आपल्या हुद्याचीं कामें सोडून देईल तर तो, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाच्या हुकुमावरून, त्याची त्यावेळेस येणें असलेली पगाराची सगळी बाकी सरकारांत जप्त केली जाण्यास पात्र होईल. पगाराची बाकी सदर्हूप्रमाणें सरकारांत जप्त करण्याची शिक्षा, सदर्हू प्रकारचा अमलदार कलम ३९ अन्वयें अगर अमलांत असलेल्या इतर कायद्याअन्वयें ज्या गुन्हेगारीस पात्र होतो त्या गुन्हेगारीशिवाय आणखी आहे असें समजावें.

ह्या कलमांतील ठराव मोडणाऱ्या पोलीस अमलदाराचा पगार सरकारांत जप्त करण्याचा अख्त्यार आहे.

३४. (१) जो कोणताहि मनुष्य कोणत्याहि कारणावरून पोलीस अमलदार राहाणार नाहीं त्यानें, आपल्या नेमणुकीचा अगर हुद्याचा दाखला आणि त्याच्या

पोलीस अमलदार न राहिलेल्या मनुष्यानें, दाखला, हत्यार,

इत्यादि हवाली केला पाहिजेत, आणि.

हुद्याचें काम चालविण्यासाठीं त्यास दिलेलीं हत्यारें, सामान, कपडे व इतर जरूरीच्या वस्तु, हीं, तीं घेण्यास ज्या पोलीस अमलदारास डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें अधिकार दिला असल त्याच्या हवालीं विलंब न लावितां केलीं पाहिजेत.

तीं हवालीं केलीं नाहींत तर तीं झाडा घेण्याच्या वारंटानें धरण्याचा अखत्यार आहे.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें हवालीं न केलेला कोणताहि दाखला, हत्यारें, सामान, कपडे व जरूरीच्या इतर वस्तु, ह्यांचा तीं जेथें ह्मणून असतील तेथें तपास करून तीं धरण्यासाठीं वारंट काढण्याचा कोणत्याहि माजिस्ट्रेटास आणि विशेष कारणांसाठीं ( तीं त्यावेळीं लिहून ठेविलीं पाहिजेत ) कोणत्याहि डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास अखत्यार आहे. याप्रमाणें काढलेलें प्रत्येक वारंट, सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड याच्या ठरावांवरहुकुम पोलीस अमलदारानें, अगर, वारंट काढणाऱ्या माजिस्ट्रेटास किंवा डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास योग्य वाटल्यास कोणत्याहि इतर मनुष्यानें, बजाविलें पाहिजे.

(३) कोणत्याहि मनुष्यास पुरविलेली जी कोणतीहि वस्तु इन्स्पेक्टर जनरल याच्या हुकुमांवरहुकुम त्या मनुष्याच्या मालकीची झालेली असेल, त्या वस्तूस ह्या कलमांतील कोणताहि ठराव लागू होणार नाहीं असें समजावें.

पोलीस अमलदारांच्या गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा.

३५. (१) जो कोणताहि पोलीस अमलदार—

(अ) कलम ३२ यांतील कोणत्याहि ठरावाचा भंग करील, आणि तो भंग इंडियन पीनल कोडाच्या १६८ व्या कलमाअन्वयें अपराध नसेल; अगर

(ब) भित्रेपणा करील; अगर

(क) कलम ३३ याविरुद्ध आपल्या हुद्याचा राजीनामा देईल अगर त्या हुद्याचीं कामें सोडून देईल; अगर

(ड) आपणास पोलीस अमलदार या नात्यानें पाळिला पाहिजे अगर मानिला पाहिजे अशा आणि ज्याचा भंग अगर अव्हेर करण्याबद्दल अमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्यांत शिक्षा सांगितली नाहीं अशा कायद्याच्या कोणत्याहि ठरावाचा अगर कोणत्याहि कानूचा अगर हुकुमाचा जाणूनबुजून भंग अगर अव्हेर करील; अगर

(इ) ज्या कर्तव्यभंगाबद्दल अमलांत असलेल्या कोणत्याहि इतर कायद्यांत स्पष्ट शिक्षा सांगितलेली नाहीं, तसा कोणताहि कर्तव्यभंग करील;

त्यास कैदेची शिक्षा केली पाहिजे व ती कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड त्या अमलदाराच्या तीन महिन्यांच्या पगाराच्या रकमेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

रजा संपतांच कामावर परत येण्यास चुकल्याचा परिणाम.

(२) रजेवर गैरहजर असलेला जो कोणताहि पोलीस अमलदार, वाजवी कारणाशिवाय, ती रजा संपतांच आपण कामावर जाण्यास तयार असल्याबद्दल रिपोर्ट करणार नाहीं, त्यानें, (क) रकमेच्या कारणांसाठीं, ३३ व्या कलमाच्या अर्थाअन्वयें आपल्या हुद्याचें काम सोडिलें आहे असें समजलें जाईल.

हुद्याचा दाखला हवालीं करण्यास चुकल्याचा परिणाम.

३६. कलम ३४ पोट-कलम (१) अन्वयें जो कोणताहि पोलीस अमलदार आपल्या नेमणुकीचा अगर हुद्याचा दाखला अगर इतर कोणतीहि वस्तु हवालीं करण्यास जाणूनबुजून हयगय करील अगर इनकार करील त्यास कैदेची शिक्षा दिली

पाहिजे व ती कैद एक महिनापर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

---

## बाब ४ थी पोलीससंबंधी नियम.

रस्त्यांची वहिवाट वगैरे बाबतींत कानू करण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

३७. (१) जिल्हा माजिस्ट्रेटास, म्युनिसिपल अधिकाऱ्यानें अगर यासंबंधानें अधिकार असलेल्या इतर अधिकाऱ्यानें केलेल्या हुकुमांस पात्र राहून, आपणास योग्य वाटेल त्या शहरांत अगर जागेंत, वेळोंवेळीं, खालीं दिलेल्या बाबतींत कानू अगर हुकुम करण्याचा अखत्यार आहे:—

(अ) आपणास वाजवी वाटतील ते प्रसंग शिवायकरून, मोडकळीस आलेल्या इमारतींपासून अगर इतर कारणापासून भय असलेले विवक्षित रस्ते अगर इतर जागा कांहीं कालपर्यंत बंद करण्याच्या बाबतींत;

(ब) ज्या इमारती, प्लाटफार्म, व इतर बांधकामें बांधतांना, त्यांची दुरूस्ती करितांना व तीं पाडितांना जाणाऱ्या येणाऱ्यांस, जवळपासच्या लोकांस, अगर इतर लोकांस धोका येण्याचा संभव असेल, त्या इमारती, प्लाटफार्म व इतर बांधकामें बांधीत असतांना दुरुस्त करीत असतांना व पाडीत असतांना मनुष्यांस आणि मालमिळकतीस इजा न पोंचण्याची तजवीज करण्याबद्दल;

(क) कोणताहि हत्ती अगर कोणतेंहि जंगली जनावर कोणत्याहि रस्त्यांतून नेण्याकरितां परवानगी देण्यास डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ज्या स्थानिक पोलीस अमलदारास नेमील त्या अमलदाराच्या परवानगी शिवाय रस्त्यांतून कोणताहि हत्ती अगर जंगली जनावर नेण्याच्या मनाईबाबद;

(ड) सदरीं सांगितलेल्या स्थानिक पोलीस अमलदाराच्या परवानगीशिवाय विवक्षित रस्त्यांतल्या घरांतून अगर इमारतींतून बाहेर किंवा त्या घरांत अगर इमारतींत किंवा अशा रस्त्यावरून नरक आणि घाणीचे पदार्थ अगर वस्तु केव्हां नेऊं नयेत आणि रस्त्यांतून अगर विवक्षित रस्त्यांतून गुरें केव्हां नेऊं नयेत याच्या वेळा ठरविण्याबाबद;

(इ) कोणत्याहि रस्त्यांत अथवा इमारतींत अगर कोणत्याहि रस्त्यावर अथवा इमारतीवर अगर कोणत्याहि रस्त्यापासून अथवा इमारतीपासून पन्नास फुटांच्या आंत कोणतेंहि गवत अगर इतर वस्तु पेटविणें अगर जाळणें किंवा आनंदप्रदर्शक अग्नि पेटविणें अगर कोणतेंहि अग्निअस्त्र अगर वाऱ्याची बंदुक मौजेनें सोडणें किंवा दारूकाम सोडणें अगर फेंकणें अगर जाळाचीं विमानें उडविणें किंवा कोणताहि खांब अगर इतर वस्तु, त्यावर दिवे अगर प्रकाशाचीं इतर साधनें लावण्यासाठीं, कोणत्याहि रस्त्याच्या बाजूस रोवणें अगर रस्त्यावर आडवीं बसविणें, या गोष्टींपैकीं कोणतीहि गोष्ट करणें ती त्या जिल्ह्याचा माजिस्ट्रेट या बाबतींत ज्या राहात्या माजिस्ट्रेटास अगर स्थानिक पोलीस अमलदारास नेमील त्यानें वेळोंवेळीं परवानगी दिलेल्या वेळाखेरीज अगर ठिकाणांखेरीज इतर ठिकाणीं करण्याच्या मनाईबाबद;

(फ) जिल्ह्याचा माजिस्ट्रेट ज्या बाबतींत वाजवी नियम करील त्या बाबती लागू नसतील अशा प्रसंगीं कोणत्याहि रस्त्यांत इमारतीचें सामान अगर इतर जिन्नस ठेवण्याची किंवा कोणताहि घोडा अगर इतर जनावर बांधण्याची अगर अटकवून ठेवण्याची मनाई करण्याबाबद;

(ग) सदरील प्रकारचे नियम लागू नसतील अशा कोणत्याहि प्रसंगीं कोणत्याहि रस्त्यांत सांसर्गिक अगर स्पर्शजन्य रोग झालेले लोक अगर माणसांचीं प्रेतें ठेवण्याची अगर फिरवण्याची मनाई करण्याबाबद;

(ह) जनावरें मारण्यासाठीं, प्रेतें अगर कातडीं साफ करण्यासाठीं, अपकारक अगर दुर्गंधी पदार्थ टाकण्यासाठीं, आणि शौचास जाण्यासाठीं जागा वेगळया राखून ठेवण्याबाबद;

(ज) चालू अगर चालू होईल अशी भीति असलेल्या मनुष्यांच्या अगर जनावरांच्या सातीच्या अगर सांसर्गिक रोगाच्या प्रसंगीं, तो रोग नाहींसा करण्यासाठीं अगर त्याचा प्रसार बंद करण्यासाठीं सरकारानें हुकुम केल्याप्रमाणें अगर पसंत केल्याप्रमाणें घरांचा भोगवटा करणारांनीं आणि त्यांत राहणारांनीं तें घर स्वच्छ ठेवण्याच्या आणि त्यांतल्या रोगबीजाचा नाश करण्याच्या बाबतींत; आणि तो रोग झालेल्या अगर झाला आहे असें वाटत असलेल्या लोकांस अगर जनावरांस वेगळें ठेऊन त्यांची व्यवस्था ठेवण्याच्या बाबतींत;

(के) सार्वजनिक विहिरी, टांकीं, तलाव, तळीं, डवकीं, नहर, नद्यांचे भाग, ओढे, नाले अगर पाण्याच्या पुरवठ्याचीं इतर द्वारें अगर साधनें हीं, पिण्याचें पाणी मिळविण्याच्या कारणासाठीं किंवा धुणें, स्नान करणें अगर दुसरें कोणतेंहि विशेष कारण यासाठीं उपयोगीं पडावीं ह्मणून राखून ठेवण्याबाबद; आणि उपयोग करण्यास नालायक होतील अशा रीतीनें तीं बिघडविण्याची मनाई करण्याबाबद;

(ल) प्रेताची व्यवस्था लावण्याची कोणतीहि जागा, कोणतीहि धर्मशाळा, गांवाची वेस अगर सार्वजनिक चवाट्याची इतर जागा हिच्या फायद्याचा व सोईचा उपयोग सर्वांत सारखा व योग्य रीतीनें व्हावा यासाठीं आणि तेथें येणाऱ्या लोकांत त्यांच्या वागणुकीच्या संबंधानें बंदोबस्त राखण्यासाठीं तिचा उपयोग कोणत्या वेळीं व कोणत्या रीतीनें करावा याचें नियमन करण्याबाबद.

अशा कानू प्रसिद्ध करण्याची रीत.

(२) रकम (क), (ड), (इ), (फ), अगर (ग) याअन्वयें जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें केलेली प्रत्येक कानू अगर हुकुम, तिची एक प्रत, त्या जिल्ह्याच्या भाषेंत, ती कानू अगर हुकुम ज्या शहरीं अगर जागीं अमलांत यावयाचा असेल त्या शहराच्या अगर जागेच्या चावडींत किंवा दुसऱ्या एकाद्या सार्वजनिक इमारतींत लावून, प्रसिद्ध केली पाहिजे, आणि, रकम (अ), (ब), (ज) (के) अगर (ल) याअन्वयें केलेल्या प्रत्येक कानूची अगर हुकुमाची एक प्रत, त्या जिल्ह्याच्या भाषेंत, ती कानू अगर तो हुकुम लागू असेल त्या इमारतीच्या, बांधकामाच्या, कामाच्या अगर जागेच्या जवळ सर्वांस दिसेल अशा जागीं लावून ठेविली पाहिजे; आणि त्या कानूशीं अगर हुकुमाशीं संबंध असलेल्या सर्व मनुष्यांनीं त्याप्रमाणें वागलें पाहिजे.

(३) या कलमाच्या (१) रकमेच्या (ज) पोट-रकमेअन्वयें केलेली प्रत्येक कानू लागलीच सरकारास कळविली पाहिजे, आणि ती, सरकारानें जास्त वेळपर्यंत लागू ठेविली नाहीं तर, पंधरा दिवसांपेक्षां जास्त वेळ अमलांत राहणार नाहीं; आणि तशी जास्त वेळ लागू ठेवल्यास सरकार हुकुम करी तोंपर्यंत अमलांत ठेविली पाहिजे.

३८. प्रत्येक जिल्हा माजिस्ट्रेटास, आपल्या जिल्ह्यांतील कोणत्याहि शहरांतल्या अगर गांवांतल्या कोणत्याहि रस्त्यांत अगर रस्त्याजवळ खडकांस सुरुंग लावण्याच्या बाबतीत अगर खणण्याच्या बाबतींत वेळोवेळीं कानू करण्याचा आणि या कानूंत अशा कामांसाठीं परवाने देण्याबद्दल ठराव करण्याचा अखत्यार आहे. जिल्हा माजिस्ट्रेटास, सुरुंग लावण्याच्या व खणण्याच्या संबंधाच्या कानू करण्याचा अखत्यार आहे.

३९. कोणत्याहि जिल्ह्यांतील अगर पोट-तुकडींतील ज्या शहरास अगर गांवास गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन हें कलम लागू केलें असेल, त्या शहरांतलें अगर गांवांतलें अमुक घर छिनालवाड्याप्रमाणें किंवा कसबिणी अगर कोणत्याहि प्रकारचे बेबंद लोक यांच्या बिऱ्हाडाप्रमाणें अगर अड्ड्याप्रमाणें वापरण्यांत येत असून त्यापासून जवळपासच्या प्रतिष्ठित लोकांस त्रास होत असतो अशी त्या जिल्ह्याच्या अगर पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटाकडे तकरार केली असतां त्या तकरारीस जबाब देण्यासाठीं त्या घराच्या मालकास अगर भाडेकऱ्यास बोलावण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे, आणि तें घर सदरीं सांगितल्याप्रमाणें वापरलें जात आहे अशी त्या माजिस्ट्रेटाची खात्री झाल्यावर, त्या घराच्या मालकास अगर भाडेकऱ्यास वाजवी मुदतीच्या आंत त्या घराचा तसा उपयोग करण्याचें बंद करण्याबद्दल हुकुम करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अखत्यार आहे; ती वाजवी मुदत त्या हुकुमांत निर्दिष्ट केली पाहिजे. छिनालवाडे बंद करणें.

४०. (१) जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास अगर तो गैरहजर असल्यास कोणत्याहि शहरांत अगर गांवांत हुकुमत असलेल्या व त्यांत अगर आसपास हजर असलेल्या माजिस्ट्रेटांपैकीं श्रेष्ठ दर्जाच्या माजिस्ट्रेटास सार्वजनिक रीतीनें अगर व्यक्तींस उद्देशून केलेल्या जाहिरनाम्याच्या द्वारें जरूर दिसेल त्या वेळीं व तितक्या वेळपर्यंत, त्या शहरांत अगर गांवांत किंवा शहराजवळ अगर गांवाजवळ नीति अगर सभ्यता यांस विरुद्ध, किंवा त्या माजिस्ट्रेटाच्या मतें, ज्यांपासून निरनिराळ्या जातींमध्यें धर्मवैर अगर द्वेष पेटण्याचा संभव आहे अशीं, किंवा ज्यांपासून कोणताहि अपराध करण्यास अगर सार्वजनिक शांतता मोडण्यास अगर कायद्यास हरकत आणण्यास अगर कायदा मान्य न करण्यास लोक चिथतील अशीं, शस्त्रें, सोटे, अगर इतर हत्यारें धारण करणें, मनुष्यें अगर प्रेतें अगर त्यांच्या प्रतिमा दाखविणें, सार्वजनिक रीतीनें आरोळ्या मारणें, गाणीं गाणें, भाषणें करणें, हावभाव करणें अगर सोंगें आणणें आणि अशीं चित्रें, चिन्हें, प्लाकार्ड अगर इतर जिन्नस किंवा वस्तु, हीं तयार करणें, त्यांचें प्रदर्शन करणें अगर तीं लोकांस वांटणें यांची मनाई करण्याचा अखत्यार आहे. अव्यवस्था न होऊं देण्याकरितां माजिस्ट्रेटांनीं हुकुम करणें.

(२) कोणत्याहि एकाद्या शहरांत अगर गांवांत हुकुमत असणारे व सारख्या दर्जाचे दोन अगर अधिक माजिस्ट्रेट असतील तेव्हां त्यां पैकीं कोणत्याहि एकास सदरीं प्रमाणें मनाईचा हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

४१. (१) कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास जर असें दिसून येईल कीं, आपल्या जिल्ह्यांतील अमुक जागीं, जत्रेमुळें, यात्रेमुळें, अगर तशा दुसऱ्या एकाद्या गोष्टीमुळें मनुष्यांचे मोठे समुदाय जमले असून अगर जमण्याचा संभव असून त्या जागीं कोणतीहि रोगाची सांत उठली आहे अगर उठण्याचा संभव आहे, तर ती जत्रांच्या वगैरे ठिकाणीं रोगाची सांत न उठूं देण्याबद्दल विशेष तजवीज करण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे.

सांत उठूं न देण्यास अगर तिचा फैलाव न होऊं देण्यास आपणांस जरूर वाटतील त्या विशेष तजविजी करण्याचा आणि त्या जागेच्या रहिवाशांनीं, आणि तेथें असलेल्या लोकांनीं अगर त्या जागीं जात असलेल्या अगर जाण्याचा इरादा असलेल्या लोकांनीं किंवा तेथून परत जात असलेल्या अगर परत जाण्याचा इरादा असलेल्या लोकांनीं पाळावयाचे असे नियम करून ते सार्वजनिक नोटिशीच्या द्वारें लोकांस कळविण्याचा त्या माजिस्ट्रेटास अख्त्यार आहे.

अशा प्रसंगीं फी बसविणें.

(२) सरकारच्या हुकुमांस पात्र राहून, जिल्हा माजिस्ट्रेटास अगर जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमावरून कलेक्टरास, खालीं लिहिल्याप्रमाणें करण्याचा कायद्यावरून अधिकार आहेः—

(अ) जमावाच्या जागीं व जवळपास आरोग्यरक्षणाची व बंदोबस्त राखण्याची व्यवस्था करण्यासाठीं लागेल त्या खर्चाची, पोट-कलम (१) याखालीं येणाऱ्या मनुष्यांवर जी वाजवी फी बसवून तजवीज करितां येईल, ती फी आकारून वसूल करण्याचा;

(ब) जमावाची जागा कोणत्याहि म्युनिसिपालिटीच्या हद्दींत असेल तेव्हां, सदरील कारणांसाठीं ज्या रकमा लागतील त्या त्या म्युनिसिपालिटीकडून वसूल करण्याचा अख्त्यार आहे.

मनुष्यांच्या टोळ्या अगर मंडळ्या मोडून टाकणें.

४२. कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटास अगर कोणत्याहि पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटास, त्या जिल्ह्यांत मनुष्यांची कोणतीहि टोळी अगर मंडळी फिरत असल्यामुळें अगर तळ देऊन राहिल्यामुळें भय अगर भीति उत्पन्न झाली आहे अगर होण्याचा संभव आहे अगर त्या टोळीचा अगर मंडळीचा अगर तींतील मनुष्यांचा बेकायदेशीर रीतीनें वागण्याचा इरादा असल्याबद्दल [ लोकांच्या मनांत ] वाजवी संशय उत्पन्न झाला आहे अगर उत्पन्न होण्याचा संभव आहे असें दिसून येईल तेव्हां, त्या टोळींतल्या अगर मंडळींतल्या लोकांनीं दंगा अगर भीति उत्पन्न न होण्यास जसें वागणें अवश्य असेल तसें वागण्याबद्दल अगर ती टोळी अगर मंडळी मोडून तींतील प्रत्येक मनुष्यानें अशा माजिस्ट्रेटानें सांगितलेल्या जागीं सांगितलेल्या रस्त्यानें जाण्याबद्दल त्या टोळीचे अगर मंडळीचे जे पुढारी अगर मुख्य ह्मणून दिसत असतील त्यांच्या नांवानें जाहिरनामा काढून तो ढोलकें वाजवून अगर आपणांस योग्य वाटेल त्या इतर रीतीनें प्रसिद्ध करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अख्त्यार आहे.

रंजनाच्या सार्वजनिक जागा व जाहीरसभा यांतल्या अव्यवस्थेबद्दल वगैरे पोलिसानें बंदोबस्त केला पाहिजे.

४३. (१) रंजनाच्या कोणत्याहि सार्वजनिक जागीं अगर जेथें येण्यास लोकांस आमंत्रण किंवा मोकळीक असेल, अशा कोणत्याहि मेळ्यांत अगर सभेंत अव्यवस्था अगर कायद्याचा भंग न होऊं देण्याकरितां, अगर जमलेल्या मंडळीवर येऊन ठेपलेल्या प्रत्यक्ष भयाचा प्रतीकार करण्याकरितां, ज्या शहरीं अगर गांवीं ती रंजनाची जागा असेल अगर तो मेळा अगर सभा भरावयाची असेल त्या शहरांत अगर गांवांत हजर असलेल्या कान्स्टेबलहून वरच्या दर्जातील वरिष्ठ पोलीस अमलदारास, कायद्यावरून केलेल्या कानू व हुकुम लागू राहून, त्या रंजनाच्या जागीं अगर मेळ्यांत अगर सभेंत लोकांस घेण्याच्या रीतीच्या संबंधानें आणि तेथें चालवावयाचें काम शांतपणें व कायदेशीर रीतीनें चालविण्यांत यावें यासाठीं आपणास जरूर वाटतील ते वाजवी हुकुम करण्याचा अख्त्यार आहे; आणि असा प्रत्येक वाजवी हुकुम सर्व मनुष्यांनीं मान्य करणें त्यांस भाग आहे

(२) पोट-कलम (१) यांतील ठरावांचा आणि त्या पोट-कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमाचा अमल चालविण्यासाठीं रंजनाच्या मेळ्याच्या अगर सभेच्या अशा प्रत्येक जागीं येण्याजाण्याची पोलिसास पूर्ण मोकळीक असली पाहिजे.

४४. कोणताहि माजिस्ट्रेट, अगर वाजवी रीतीनें या संबंधाचे अधिकार दिलेला इतर अधिकारी कोणत्याहि वेळीं कायदेशीरपणें करील त्या कोणत्याहि कानून अगर हुकुमास पात्र राहून, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास अगर कोणत्याहि असिस्टंट सुपरिंटेंडेंटास,

सार्वजनिक रस्त्यांवर जमलेल्या लोकांचें वगैरे पोलिसानें नियमन करावें.

(अ) रस्त्यांवरच्या मेळ्यांच्या व्यवस्थेविषयीं आणि रस्त्यांतून जाणाऱ्या मिरवणुकींविषयीं कानू व हुकुम करण्याचा अख्त्यार आहेः आणि, मिरवणुकींच्या बाबतींत त्यांनीं कोण कोणत्या रस्त्यानें, कोणत्या क्रमानें, आणि कोणत्या वेळीं जावें हें ठरविण्याचा अख्त्यार आहे;

(ब) रस्त्यांत अगर रस्त्याजवळ वाद्यें वाजवणें, ढोलकीं, डफ अगर इतर वाद्यें वडवणें आणि शिंगें अगर कर्कश इतर वाद्यें फुंकणें किंवा वाजविणें यांचे, परवाने देऊन अगर इतर रीतीनें नियमन करण्याचा आणि त्यांवर निर्बंध ठेवण्याचा अख्त्यार आहे;

(क) कोणत्याहि माजिस्ट्रेटानें या आक्टाच्या ३७–४२ या कलमा अन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमाखालचे व त्या हुकुमास पुष्टी आणणारे असे वाजवी हुकुम करण्याचा अख्त्यार आहे.

४५. (१) डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास, जाहीर नोटीस देऊन असा हुकुम करण्याचा अधिकार आहे कीं, बरोबर कोणी मनुष्य नसलेला असा जो कोणताहि कुत्रा रस्त्यांत असेल, यास श्वासोछ्वास करण्यास व पाणी पिण्यास हरकत न पडतां त्याच्या चावण्याचा पूर्णपणें बंदोबस्त होईल असे मुसकें घातलेलें पाहिजे; आणि असा हुकुम अमलांत असतांना, यापुढें पोट-कलम (२) यांत ठरविलें आहे तें प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं जो कोणताहि कुत्रा आपल्या धन्याच्या जागेबाहेर कोणत्यांहि जागीं मोकळा सांपडेल त्याचा नाश करण्याचा अगर त्याचा धनी त्यावर दावा सांगे तोंपर्यंत, त्यास योग्य मुसकें घाली तोंपर्यंत आणि त्याचा ठेवण्याचा सर्व खर्च देई तोंपर्यंत त्यास अडकवून ठेवण्याचा पोलिसास अख्त्यार आहे.

कुत्र्यांच्या संबधानें ठराव.

(२) गळ्यांत मालकाचे नांवाचा पट्टा असलेला कोणताहि कुत्रा, तो पिसाळलेला असल्यास तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, धन्यानें त्यावर आपला हक्क सांगून त्याला ठेवण्याचा सर्व खर्च दिल्याशिवाय तो कुत्रा जर पुरे तीन दिवस पोलिसाच्या ताब्यांत राही तोंपर्यंत पोलिसानें त्याचा नाश करूं नये; परंतु जो कुत्रा सदरील मुदतीपर्यंत पोलिसाच्या ताब्यांत राहून ज्यावर त्याचा धनी त्या मुदतींत हक्क सांगणार नाहीं अगर सदरील खर्च देणार नाहीं, त्या कुत्र्यास विकण्याचा अगर त्याचा नाश करण्याचा पोलिसास अख्त्यार आहे.

पोलिसानें कुत्र्यांचा नाश केव्हां करावा व ते केव्हां विकावे.

(३) पोलिसानें पकडलेल्या कोणत्याहि कुत्र्याच्या गळ्यांत पट्टा असून त्यावर जर कोणत्याहि मनुष्याचा पत्ता लिहिलेला असला, तर, तो कुत्रा पकडला असल्या बद्दल एक पत्र लागलेंच पोष्टानें त्या पत्त्यावर पाठविलें पाहिजे.

ज्यावर धन्याचा पत्ता लिहिला आहे असा पट्टा असलेल्या कुत्र्याबाबद ठराव.

४६. ह्या बाबीअन्वयें डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटास अगर त्याच्या हाताखालच्या कोणत्याहि अमलदारास दिलेला प्रत्येक अधिकार जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हुकुमांस पात्र राहून चालविला पाहिजे, आणि जिल्हा माजिस्ट्रेटानें ह्या बाबीखालीं केलेल्या सर्व कानू, नियम, व हुकुम कलम १३ (२) यांतील ठरावांस पात्र राहातील असें समजावें.

डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटानें आणि जिल्हा माजिस्ट्रेटांनीं ह्या बाबीखालचे अधिकार अनुक्रमें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाच्या व सरकारच्या निर्बंधास पात्र राहून चालविले पाहिजेत.

## भाग ५ वी.

### पोलिसाचे बजावणीचे अधिकार व त्याचीं कामें.

पोलीस अमलदाराचीं हुद्यांचीं कामें.

४७. (१) प्रत्येक पोलीस अमलदारानें—

(अ) त्यास योग्य अधिकाऱ्यानें कायदेशीरपणें दिलेलें प्रत्येक वारंट अगर इतर हुकुम तात्काल मानून बजाविलें पाहिजे;

(ब) आपणास करवेल तितका प्रयत्न करून, काग्निझेबल गुन्हे झाल्याबद्दल अगर तसे गुन्हे करण्याच्या इराद्याबद्दल बातमी मिळविली पाहिजे, आणि कायद्यास व आपणाला आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून झालेल्या हुकुमांस अनुसरून, ती बातमी वरिष्ठ अधिकाऱ्यांस कळवून ज्या तजविजींच्या योगानें गुन्हेगार इन्साफास आणितां येतील अगर तशा गुन्ह्यांचा प्रतिबंध करतां येईल तशा इतर तजविजी केल्या पाहिजेत;

(क) आपणास करवेल तितकें करून सार्वजनिक पीडा करण्याची बंदी केली पाहिजे;

(ड) ज्या इसमांस धरण्याचा त्यास कायद्यावरून अधिकार असेल आणि ज्यांस धरण्यास पुरी सबब असेल त्या सर्वांस धरलें पाहिजे;

(इ) विवक्षित काळीं अमलांत असलेला महसुलाबाबतचा कोणताहि कायदा अगर इतर कायदा यांत आपणास नेमून दिलेलीं कामें केलीं पाहिजेत.

लोकांच्या जमण्याच्या जागांत शिरण्याचा अधिकार.

(२) सरकारानें अगर कायद्यावरून अधिकार दिलेल्या मनुष्यानें केलेल्या कानू व हुकुम लागू राहून, प्रत्येक पोलीस अमलदारास, सदरील कारणांपैकीं कोणत्याहि कारणासाठीं, लोकांच्या कोणत्याहि जमण्याच्या जागेत, आणि कोणत्याहि जागेचा दारू विकण्याच्या दुकानाप्रमाणें अगर कैफी पदार्थ विकण्याच्या दुकानाप्रमाणें, अगर बेबंद किंवा बदमाष लोकांच्या आड्याच्या ठिकाणाप्रमाणें उपयोग होत असतो असें मानण्यास त्यास कारण असेल त्या ठिकाणांत वारंटाशिवाय शिरून तें तपासण्याचा अखत्यार आहे.

लोकांच्या संबंधानें पोलीस अमलदारांचीं कामें.

४८. खालीं लिहिल्याप्रमाणें करणें हें प्रत्येक पोलीस अमलदाराचें कर्तव्य आहे असें समजावें:—

(अ) रस्त्यांतल्या शक्तिहीन अगर पराधीन मनुष्यांस करवेल तितकी प्रत्येक प्रकारची मदत करणें, आणि कैफ आलेले लोक व वेडे लोक जे इकडे तिकडे फिरत असून ज्यांपासून धोका होण्याचा संभव असेल अगर जे आपणांस सांभाळण्यास असमर्थ असतील त्यांस आपल्या ताब्यांत घेणें;

(ब) धरलेला अगर अटकवून ठेवलेला कोणताहि मनुष्य जखमी अगर आजारी असल्यास त्याकरितां जरूर असेल ती मदत मिळविण्यासाठीं तत्काळ तजवीज करणें आणि अशा मनुष्यावर पाहरा करितांना अगर त्यास एका जागेहून दुसऱ्या जागीं नेतांना त्याच्या अवस्थेकडे योग्य लक्ष पोंचविणें;

(क) जो कोणताहि मनुष्य धरलेला अगर अटकावून ठेविलेला असेल त्याला योग्य खाणें देण्याबद्दल तजवीज करणें;

(ड) झाडे घेतांना निष्कारण दांडगाई न करणें व विनाकारण त्रास न देणें;

(इ) स्त्रिया व मुलें यांशीं वागतांना कडक मर्यादेनें व वाजवी सौम्यपणानें वागणें;

(फ) आगीनें तोटा अगर नुकसान न होऊं देण्यास हरप्रयत्न करणें;

(ग) सार्वजनिक अपघात अगर संकट निवारण्याकरितां हरप्रयत्न करणें.

४९. (१) खालीं लिहिलेलीं कामें पोलिसानें केलीं पाहिजेत:—

(अ) रस्त्यांतल्या रहदारीचें नियमन करणें व तिजवर निर्बंध ठेवणें, रस्त्यांत अडथळे न येऊं देणें आणि, आपणांस करवेल तितका प्रयत्न करून, रस्त्यांतल्या अगर रस्त्यांजवळच्या लोकांनीं मानण्यासाठीं ह्या आक्टाअन्वयें अगर अमलांत असलेल्या इतर कोणत्याहि कायद्याअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूचा अगर हुकुमाचा भंग न होऊं देणें; — पोलिसानें रस्त्यांतल्या रहदारीचें वगैरे नियमन करणें; आणि

(ब) रस्त्यांत आणि आंघोळीचे, धुण्याचे आणि उताराचे सार्वजनिक जागीं आणि जागांत, जत्रांचे ठिकाणीं आणि जत्रांत, देवळांत आणि देवळांच्या आंत किंवा लोक जमण्याचे इतर सर्व जागीं आणि जागांत, आणि सार्वजनिक ईश्वरभक्तीच्या वेळीं, सार्वजनिक ईश्वरभक्तीच्या जागेच्या आसपास, बंदोबस्त ठेवणें: — रस्त्यांत आणि इतर सार्वजनिक जागांत बंदोबस्त ठेवणें; आणि

(क) आंघोळीच्या, धुण्याच्या आणि उताराच्या सार्वजनिक जागीं लोकांच्या जाण्यायेण्याचें नियमन करणें, त्या जागीं आणि सार्वजनिक तरींत जास्त गर्दी न होऊं देणें, आणि, अशा कोणत्याहि जागीं अगर तरींत लोकांनीं मानण्यासाठीं कायद्याअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूचा अगर हुकुमाचा, करवेल तितका प्रयत्न करून, भंग न होऊं देणें. — सार्वजनिक जागांत जाण्यायेण्याचें नियमन करणें.

(२) सदरील कामांपैकीं कोणतेंहि काम करितांना कोणत्याहि पोलीस अमलदारानें केलेले वाजवी हुकूम सर्व मनुष्यांनीं मानिले पाहिजेत.

५०. कलम ४० अन्वयें कोणताहि जाहिरनामा काढल्यानंतर, जो कोणताहि मनुष्य त्या जाहिरनाम्याविरुद्ध वागत असेल अगर वागणार असेल, त्यास तसें न वागण्यास अगर तसें वागण्याचें वर्जिण्यास हुकूम करण्याचा आणि त्या मनुष्यानें तसें करण्याचा इनकार केल्यास अगर तो हुकुम न मानिल्यास त्यास धरण्याचा कोणत्याहि माजिस्ट्रेटास अगर पोलीस अमलदारास कायद्यावरून अधिकार आहे. आणि अशा माजिस्ट्रेटास अगर पोलीस अमलदारास, अशा जाहिरनाम्याचा सदरीं सांगितल्याप्रमाणें भंग करण्यांत ज्या वस्तूचा अगर जिन्नसेचा उपयोग करण्यांत येईल अगर उपयोग केला जाणार असेल ती वस्तु अगर जिन्नस ताब्यांत घेण्याचाहि अखत्यार आहे, आणि त्या जागीं ज्या माजिस्ट्रेटाची हुकुमत असेल त्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमाप्रमाणें त्या ताब्यांत घेतलेल्या वस्तूची व्यवस्था केली जाईल. — कलम ४० अन्वयें केलेले हुकुम बजावणें.

५१. जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें कलम ४१ अन्वयें अगर जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें किंवा एकाद्या पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटानें कलम ४२ अन्वयें केलेला प्रत्येक नियम व जाहिरनामा लोकांकडून योग्य रीतीनें मानिला जातो कीं नाहीं तें पाहाणें, जे लोक अज्ञानामुळें तो मानण्यास चुकत असतील त्यांस सावध करणें आणि जो कोणताहि मनुष्य जाणूनबुजून तो मानणार नाहीं त्यास धरणें हें पोलिसाचें काम आहे असें समजावें. — कलम ४१ अगर कलम ४२ अन्वयें केलेले हुकम मानिले जातील अशी पोलिसानें तजवीज करावी.

बेवारसी माल पोलिसानें ताब्यांत घ्यावा.

९२. पोलिसास सांपडलेला अगर त्यांच्या हवालीं केलेला सर्व बेवारसी माल पोलिसानें तात्पुरता आपल्या ताब्यांत ठेविला पाहिजे, आणि तो माल ज्या शहरांत अगर गांवांत सांपडला असेल त्या शहरास अगर गांवास पोलीस पाटील असल्यास त्या पाटिलाच्या हवालीं तो सर्व माल करून त्याची त्या मालाबद्दल पावती घेतली पाहिजे, आणि तो पाटील ज्या माजिस्ट्रेटाचा तावेदार असेल त्याकडे त्या पाटलानें तो माल पाठविला पाहिजे. त्या शहरास किंवा गांवास पोलीस पाटील नसल्यास, त्या जिल्ह्याचा माजिस्ट्रेट ज्या माजिस्ट्रेटाची या बाबतींत वेळोवेळीं नेमणूक करील, त्या माजिस्ट्रेटाकडे पोलिसानें त्या बेवारसी मालाबद्दल रिपोर्ट करावा, आणि त्यानंतर तो जिल्हा-माजिस्ट्रेट सांगेल त्याप्रमाणें करावें.

अशा मालाची माजिस्ट्रेटानें व्यवस्था करणें.

९३. (१) गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें अगर सन १८६७ चा मुंबईचा गांवचा पोलीस आक्ट, कलम १९, या अन्वयें ज्या मालाबद्दल माजिस्ट्रेटाकडे रिपोर्ट केला असेल, तो माल, मृत्युपत्र न करितां मेलेल्या व ज्याचे वारस असल्याबद्दल माहिती नाहीं अशा मनुष्याचा आहे आणि तो जाहीर लिलावानें विकल्यानें त्यापासून दाहांपेक्षां जास्त रुपये नक्की उत्पन्न होतील असा संभव आहे असा त्या माजिस्ट्रेटाचा अभिप्राय असल्यास, त्यानें त्या मालाची सन १८२७ चे रेग्युलेशन ८ वें (वारस किंवा मामुलचालीप्रमाणें वारशाची वहिवाट करणार किंवा मृत्युपत्र चालविणार मान्य होण्याविषयीं वगैरे आक्ट) याच्या १० व्या कलमाच्या ठरावांअन्वयें अगर अमलांत असलेल्या इतर कायद्याअन्वयें व्यवस्था करावयाच्या उद्देशानें डिस्ट्रिक्ट जज्जास कळविलें पाहिजे.

(२) इतर कोणत्याहि प्रसंगीं, त्या माजिस्ट्रेटानें एक जाहिरनामा काढून, त्या जाहिरनाम्यांत त्या मालांत जे जिन्नस असतील तें नमूद करून ज्या कोणत्याहि मनुष्याचा त्या मालावर हक्क असेल त्या मनुष्यानें त्या जाहिरनाम्याच्या तारिखेनंतर साहा महिन्यांच्या आंत आपला हक्क त्या माजिस्ट्रेटापुढें अगर या कारणासाठीं तो माजिस्ट्रेट ज्या कोणत्याहि इतर अमलदारास नेमील त्या अमलदारापुढें शाबीत केला पाहिजे असें जाहीर करावें. सदरील मुदतींत त्या मालावर जर कोणत्याहि मनुष्यानं आपला हक्क स्थापित केला नाहीं, तर तो माल सरकारच्या सत्तेंत राहील, आणि त्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमावरहुकुम तो जाहीर लिलावानें विकण्याचा अख्त्यार आहे.

(३) सदरीं सांगितलेल्या रेग्युलेशनच्या १० व्या कलमांतील ठराव, ज्या मृत्युपत्राविरहित मालमिळकतीची व्यवस्था कोणत्याहि माजिस्ट्रेटानें पोट-कलम (२) अन्वयें लाविली असेल त्या मालमिळकतीस लागू होणार नाहीं असें समजावें.

लवकर नासणारा माल तावडतोब विकण्याचा अधिकार.

९४. सदरीं सांगितल्याप्रमाणें ज्या मालाबद्दल रिपोर्ट केला असेल तो स्वभावतः लवकर नासण्याजोगा असल्यास, अगर त्यांत जिवंत जनावरें असल्यास, अगर पांच रुपयांपेक्षां कमी किमतीचा दिसत असल्यास तो जाहीर लिलावानें विकण्याविषयीं तावडतोब हुकुम करण्याचा त्या माजिस्ट्रेटास अख्त्यार आहे; आणि गेल्या शेवटल्या कलमांतले ठराव, लागू करितां येतील तेथवर, त्या विक्रीच्या नक्की उत्पन्नास लागू केले जातील असें समजावें.

---

## बाब ६ वी.—अपराध व शिक्षा.

रस्त्यांतल्या विवक्षित अपराधांबद्दल व पींडांबद्दल शिक्षा.

९५. मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीरनामा देऊन गव्हर्नर इन् कौन्सिल ज्या स्थानिक प्रदेशास हें कलम अगर त्याचा कोणताहि भाग वेळोवेळीं लागू करितील त्या प्रदेशांत जो कोणताहि मनुष्य त्या कलमाविरुद्ध अगर त्याच्या त्या भागाविरुद्ध—

(अ) सर्यास्तानंतर पाऊण तास व सूर्योदयापूर्वीं एक तास या वेळांच्या दरमियान कोणत्याहि वेळीं कोणत्याहि प्रकारचें वाहन पुरता उजेड पडे अशा दिव्याशिवाय (अशा दिव्याची गरज लागणार नाहीं असें चांदणें असेल ते प्रसंग शिवाय करून) कायदेशीर कारणावांचून, कोणत्याहि रस्त्यांतून हांकीत नेईल अगर कोणत्याहि रस्त्यांत उभें ठेवील, त्यास; — अंधाऱ्या रात्रीं दिव्याशिवाय गाडी हांकणें;

(ब) कोणत्याहि रस्त्यांतून कोणत्याहि प्रकारचें वाहन हांकिते वेळेस (पुढें सांगितल्याप्रमाणें न वागण्यास निकडीचें अगर वाजवी कारण असेल ते प्रसंग खेरीज करून,) समोरून कोणतेंहि इतर वाहन आलें असतां त्या रस्त्याच्या डाव्या बाजूनें जाणार नाहीं अगर इतर कोणत्याहि वाहनाच्या जवळून जाते वेळेस त्या रस्त्याच्या उजव्या बाजूनें जाणार नाहीं, त्यास; — रस्त्यासंबंधीं नियमाकडे दुर्लक्ष करणें;

(क) कोणत्याहि रस्त्यांत अपुरी राखण ठेवलेलें अगर अपुरा बंदोबस्त केलेलें जनावर अगर वाहन ठेवील, त्यास; — अपुरी राखण ठेवलेलें गुरं वगैरे रस्त्यावर ठेवणें;

(ड) कोणत्याहि जनावरास हांकतांना, वागवतांना अगर राखतांना कोणत्याहि प्रकारच्या गैरवर्तनानें, गफलतीनें अगर वाईट रीतीनें वागवण्यानें कोणत्याहि रस्त्यांत अडथळा अगर नुकसान करील, त्यास; — जनावरांकडून अडथळा अगर नुकसान करविणें;

(इ) कोणत्याहि रस्त्यांत, कोणतेंहि जनावर अगर वाहन भाड्याकरितां अगर विकावयाकरितां ठेवील, कोणतेंहि सामान अगर वाहन साफ करील, किंवा कोणत्याहि घोड्यास अगर इतर जनावरास साफ करील, खरारा करील, शिकवील किंवा वठणीस आणील, किंवा, कोणतेंहि वाहन अगर त्याचा कोणताहि भाग (अपघाताच्या वेळीं जागचे जागीं दुरुस्त करण्याचे जरूरीचे प्रसंग खेरीजकरून इतर प्रसंगीं) दुरुस्त करील, किंवा त्या रस्त्यांत रहदारीस फार अडचण अगर तेथें राहणाऱ्यास अगर इतर लोकांस फार त्रास होईल असें कोणतेंहि कारखान्याचें काम अगर इतर कृत्य करील, त्यास; — कोणतेंहि जनावर भाड्याकरितां, अगर विकावयाकरितां वगैरे रस्त्यावर ठेवणें;

(फ) ज्या कोणत्याहि जनावरावर अगर वाहनावर ओझें लादावयाचें असेल अगर ज्यावरून ओझें उतरावयाचें असेल अगर ज्यास उतारू घ्यावयाचे अगर उतरावयाचे असतील त्या जनावरास अगर वाहनास तें काम करण्यास जो वेळ जरूर असेल त्यापेक्षां जास्त वेळ कोणत्याहि रस्त्यांत राहूं देऊन अगर उभें करून अथवा कोणत्याहि रस्त्यांत कोणतेंहि वाहन उभें ठेवून अगर गुरें बांधून, अथवा कोणत्याहि रस्त्याच्या कोणत्याहि भागाचा वाहनांच्या अगर गुरांच्या अड्ड्याप्रमाणें उपयोग करून, अथवा कोणत्याहि रस्त्यांत अगर रस्त्यावर कोणतीहि पेटी, गठ्ठा, प्याकेज अगर इतर कोणतीहि वस्तु गैर वाजवी वेळपर्यंत राहूं देऊन, अथवा कोणतेंहि पाल, छप्पर, फळी, पीप, टोपली, यांत अगर यांवर अगर इतर कोणत्याहि रीतीनें कोणतीहि जिन्नस विकावयास ठेवून अगर मांडून कोणत्याहि रस्त्यांत अडथळा करील, त्यास; — रस्त्यांत अडथळा करणें;

(ग) कोणत्याहि पायरस्त्यांत अडथळा करील, अथवा कोणत्याहि पायरस्त्यावरून कोणतेंहि जनावर चालवून, अगर कोणत्याहि जनावरावर बसून जाऊन अगर कोणतेंहि जनावर सोडून देऊन किंवा अशा पायरस्त्यावर कोणतेंहि वाहन हांकून अगर ओढून नेऊन — पायरस्त्यांत अडथळा करणें;

अथवा त्या पायरस्त्यावर आडवें अगर उभें राहील असें कोणतेंहि जनावर बांधून त्या पायरस्त्यावर भीति, भय, अगर त्रास उत्पन्न करील, त्यास ;

सोंगांचे गानवादनाचे अगर इतर प्रकारचे तमाशे रस्त्यांत करणें;

(इ) जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें करून प्रसिद्ध केलेल्या कोणत्याहि नियमाविरुद्ध, गर्दी जमेल अशा प्रकारचे सोंगाचे खेळ, गानवाद्दनाचे अगर इतर प्रकारचे तमाशे करील, अगर जाणाऱ्या येणाऱ्यांस प्रतिबंध होण्यासारख्या अगर रहिवाशांस त्रास होण्यासारख्या मोठाल्या जाहिराती, चित्रें, प्रतिमा व चिन्हें कोणत्याहि रस्त्यांतून नेईल अगर रस्त्यांत ठेवील, त्यास,

सार्वजनिक रस्त्यांवर अगर रस्त्यांजवळ त्रासकारक कृत्यें करणें;

(ज) कोणतेंहि जनावर मारण्यासाठीं, मारलेलें जनावर अगर कातडें साफ करण्यासाठीं, शौचास जाण्यासाठीं, आंघोळीसाठीं अगर आंग धुण्यासाठीं डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाच्या अगर या संबंधानें कायदेशीर अधिकार असलेल्या इतर मनुष्याच्या हुकुमावरून वेगळ्या राखून ठेवलेल्या जागा शिवाय करून कोणत्याहि रस्त्यांत अगर रस्त्याजवळ आणि रस्त्यापासून दिसेल अशा जागीं जवळच्या रहिवाशांस अगर जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांस त्रास होईल अशा रीतीनें तसें कोणतेंहि काम करील, त्यास,

घोडे मोकळे सोडणें आणि मुसकें न घातलेले उग्र कुत्रे मोकळे राहूं देणें;

(के) कोणत्याहि घोड्यास हयगयीनें मोकळें सोडून देईल अगर कोणत्याहि उग्र कुत्र्यास मुसकें घातल्याशिवाय मोकळें राहूं देईल, अगर कोणत्याहि मनुष्यावर किंवा घोड्यावर किंवा इतर जनावरावर चालून जाण्यासाठीं, त्यास त्रास देण्यासाठीं किंवा भिवविण्यासाठीं कोणत्याहि कुत्र्यास किंवा इतर जनावरास भर भरील किंवा चिथवील, त्यास;

स्नानाकरितां अगर धुण्याकरितां राखून न ठेवलेल्या जागीं स्नान करणें अगर धुणें;

(ल) अंघोळीकरितां अगर धुण्याकरितां जिल्हा -माजिस्ट्रेटानें अगर त्या बाबतींत कायदेशीर अधिकार असलेल्या इतर मनुष्यानें राखून न ठेवलेल्या कोणत्याहि सार्वजनिक विहिरींत, टाक्यांत, तलावांत, तळ्यात, डवक्यांत, नहरांत अगर नदीचे, ओढ्याचे, नाल्यांचे, अगर पाण्याच्या पुरवठ्याचें जें इतर द्वार अगर साधन त्याचे कोणतेहि भागांत, अगर त्याजवळ अंघोळ करील, अगर धुवील, त्यास;

सार्वजनिक विहिरींतील वगैरे पाणी खराब करणें;

(म) कोणत्याहि सार्वजनिक विहिरींतील, टाक्यांतील, तलावांतील, तळ्यांतील, डवक्यांतील, नहरांतील अगर नदीचे, ओढ्याचे, नाल्याचे अगर पाण्याच्या पुरवठ्याच्या इतर द्वाराचे अगर साधनाचे कोणतेहि भागांतील पाणी ज्या कामाकरितां सदरीं सांगितल्याप्रमाणें राखून ठेविलेलें असेल त्या कामास तें कमी उपयोगी पडेल अशा रीतीनें तें खराब करील अगर करवील, त्यास;

आंघोळ करणाऱ्यांस अडचण करणें;

(न) सदरींप्रमाणें आंघोळीसाठीं राखून ठेवलेल्या कोणत्याहि जागेंत आंघोळ करीत असलेल्या कोणत्याहि मनुष्यास जाणूनबुजून आंत शिरून अगर ती जागा सदरींप्रमाणें ज्या कारणासाठीं राखून ठेविलेली नसेल त्या कारणासाठीं तिचा उपयोग करून, अडचण अगर गैरसोय करील, त्यास;

लोकांसमक्ष असभ्य वर्तन ;

(ओ) कोणत्याहि रस्त्यांत किंवा लोक जमतात अशा जागेंत किंवा कोणत्याहि सार्वजनिक कचेरींत, स्टेशनांत अगर स्टेशनाचे इमार

तींत जाणूनवुजुन व निर्लज्ज रीतीनें आपलें शरीर उघडें ठेवील बीभत्स भाषण करील किंवा निलाजरेपणानें, दांडगाईनें अगर अव्यवस्थितपणें वागेल, त्यास;

(प) कोणत्याहि रस्त्यांत अगर लोक जमतात अशा जागीं दारू पिऊन स्वतःचा सांभाळ करवत नाहीं इतका धुंद होईल, त्यास; — दारू पिऊन धुंद होणें;

(क्य) शांततेचा भंग व्हावा अशा इराद्यानें अगर ज्यांपासून शांततेचा भंग होण्याचा संभव आहे असे धमकीचे, शिवीगाळीचे अगर अपमानास्पद शद्ब कोणत्याहि रस्त्यांत बोलेल अगर तशी वर्तणूक करील, त्यास; — शांततेचा भंग व्हावा अशा इराद्यानें गैरवर्तन करणें;

(र) कोणत्याहि रस्त्यांत, अगर रस्त्याजवळ, अगर रस्त्यांतून दिसे अशा जागीं भिक्षेकरितां विनवणी करील अगर भिक्षा मागेल, किंवा दया आणण्याच्या उद्देशानें कोणतीहि कुरूपता, रोग, अगर कोणतेंहि किळस आणणारें क्षत अगर जखम उघड करून दाखवील, त्यास; — भीक मागणें आणि किळस आणणारे रोग उघडे करून दाखविणें;

दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पन्नास रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे.

९६. जो कोणताहि मनुष्य, कोणत्याहि जनावरास निर्दयपणें बडवील, बडवील अगर बडवायास लावील, किंवा त्यास काठी वगैरे टोंचील, टोंचवील अगर टोंचायास लावील किंवा त्याकडून जास्त काम घेईल, घेववील अगर घ्यायास लावील, किंवा वाईट रीतीनें वागवील, वागववील अगर वागवायास लावील किंवा त्याचे हाल करील, करवील अगर करावयास लावील; — जनावरास क्रूरपणा केल्याबद्दल शिक्षा.

त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती एक महिनापर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड शंभर रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

९७. जो कोणताहि पोलीस अमलदार— — पोलिसानें त्रासदायक रीतीनें झाडा घेतल्याबद्दल व धरल्याबद्दल शिक्षा.

(अ) कायदेशीर अधिकाराशिवाय अगर वाजवी कारणाशिवाय कोणत्याहि इमारतींत, तारवांत, तंबूंत अगर जागेंत शिरेल अगर [इतर मनुष्यास] शिरवील किंवा तिचा झाडा घेईल अगर घेववील; अगर

(ब) कोणत्याहि मनुष्याची मालीमलकत त्रासदायक रीतीनें आणि निष्कारण धरील; अगर

(क) कोणत्याहि मनुष्यास त्रासदायक रीतीनें व निष्कारण अटकवील, त्याचा झाडा घेईल, अगर त्यास पकडील; अगर

(ड) आपल्या अटकेंत असलेल्या कोणत्याहि मनुष्यावर विनाकारण शारीरिक जबरदस्ती करील;

(इ) कायदेशीर नाहीं अशी कोणतीहि धमकी अगर वचन कोणत्याहि आरोपीस देईल;

त्यास अशा प्रत्येक अपराधाबद्दल दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पांचशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे.

९८. जो कोणताहि पोलीस अमलदार, कोणत्याहि पकडलेल्या मनुष्यास माजिस्ट्रेटाकडे अगर ज्या इतर अधिकाऱ्याकडे त्या मनुष्यास पाठविणें कायद्यावरून भाग असेल त्या अधिकाऱ्याकडे पाठविण्यास त्रासदायक रीतीनें — पकडलेल्या मनुष्यास पाठविण्यांत त्रासदायक विलंब झाला असतां शिक्षा.

आणि विनाकारण विलंब लावील, त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे.

कलम ३७ खालच्या कानू अगर कलम ४९ खालचे हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

५९. जो कोणताहि मनुष्य—

(अ) कलम ३७ अन्वयें केलेली कोणतीहि कानू मोडील, अगर

(ब) कलम ४९ अन्वयें पोलिसानें केलेल्या कोणत्याहि हुकुमास विरोध करील अगर त्या बरहुकुम वागण्यास चुकेल;

(क) रकम (अ) अगर (ब) याखालचा कोणताहि अपराध करण्यांत मदत करील;

त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पन्नास रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे.

कलम ३८ अन्वयें केलेल्या कानू वगैरे मोडल्याबद्दल शिक्षा.

६०. कलम ३८ अन्वयें केलेली कोणतीहि कानू अगर त्या कानूअन्वयें दिलेल्या कोणत्याहि परवान्याची अट मोडील, त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड शंभर रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे.

कलम ३९ खालीं केलेला हुकुम मानण्यास चुकल्याबद्दल शिक्षा.

६१. जो कोणताहि मनुष्य कलम ३९ अन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमाबरहुकुम वागण्यास चुकेल, त्यास, त्याकडून तो हुकुम मानिला जाणार नाहीं त्या प्रत्येक दिवसाबद्दल दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पंचवीस रु येपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे.

कलमें ४०, ४३ व ४४ यांखालच्या कानू अगर हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

६२. जो कोणताहि मनुष्य—

(अ) कलम ४० अन्वयें केलेला कोणताहि कायदेशीर हुकुम पाळणार नाहीं,

(ब) कलम ४३ अन्वयें पोलिसानें केलेल्या कोणत्याहि हुकुमास विरोध करील अगर त्याबरहुकुम वागण्यास चुकेल; अगर

(क) कलम ४४ अन्वयें पोलिसानें केलेल्या कोणत्याहि कानूस अगर दिलेल्या कोणत्याहि हुकुमास विरोध करील अगर तो अमान्य करील; अगर

(ड) सदरील कलमाच्या (ब) रकमेअन्वयें दिलेल्या परवान्याची कोणतीहि अट मोडील; अगर

(इ) रकम (अ), (ब), (क) अगर (ड) खालचा कोणताहि अपराध करण्यांत मदत करील;

त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे, व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे.

कलम ४१ या खालचा नियम मोडल्याबद्दल शिक्षा.

६३. जो कोणताहि मनुष्य, कलम ४१ अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमाचा भंग करील अगर भंग करण्यांत मदत करील, त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड दोनशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

कलम ४२ अन्वयें केलेला खालचा हुकुम मोडल्याबद्दल शिक्षा.

६४. जो कोणताहि मनुष्य, कलम ४२ अन्वयें कोणत्याहि जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटानें अगर पोट-तुकडीच्या माजिस्ट्रेटानें केलेल्या कोणत्याहि हुकुमास विरोध करील अगर तो अमान्य करील किंवा अशा हुकुमाचा विरोध करण्यांत अगर तो अमान्य करण्यांत मदत करील, त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद

एक महिनापर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड शंभर रुपयेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

कलम ५० अन्वयें केलेल्या हुकुमास विरोध केल्याबद्दल अगर तो न मानिल्याबद्दल शिक्षा.

६५. जो कोणताहि मनुष्य, कलम् ९० अन्वयें कोणत्याहि माजिस्ट्रेटानें किंवा पोलीस अमलदारानें केलेल्या कोणत्याहि वाजवी हुकुमास विरोध करील अगर तो हुकुम तावडतोब मान्य करणार नाहीं किंवा तशा हुकुमाचा विरोध करण्यांत अगर तो हुकुम अमान्य करण्यांत मदत करील त्यास कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद तीन महिनेपर्यंत ठरविण्याचा अखत्यार आहे, अगर त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पांचशें रुपयेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, अगर त्यास दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

अपराधी जेव्हां कान्स्टेबला-च्या वरच्या दरजाचा पोलीस अमलदार असेल, तेव्हां इन्साफाचा अधिकार कोणाकडे.

६६. ह्या आक्टाच्या विरुद्ध अपराधांचा इन्साफ, आरोपित मनुष्य अगर आरोपित मनुष्यांपैकीं कोणताहि मनुष्य कान्स्टेबलाच्या वरच्या दर्जापैकीं असेल तेव्हां, पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें मात्र केला पाहिजे.

ह्या आक्टाविरुद्ध विशिष्ट अपराधाबद्दल फिर्याद करणें पोलिसाच्या नजरेवर आहे.

६७. कलमें ५५, ५६, ५९, ६१, ६२, ६३, अगर ६४, यांत ज्या अपराधांस शिक्षा सांगितली आहे त्यांपैकीं ज्या कोणत्याहि अपराधावरून विशेष अपाय झाला नसेल, आणि ताकीद दिल्याबरोबर जो करणें बंद झालें असेल, त्या अपराधाबद्दल फिर्याद करणें पोलिसास भाग पडणार नाहीं.

इतर कायद्यांखालच्या अपराधांबद्दल फिर्याद करण्यास ह्या आक्टावरून बाध येत नाहीं.

६८. ह्या आक्टांत ज्या कोणत्याहि अपराधास शिक्षा सांगितली आहे त्या अपराधाबद्दल इतर कोणत्याहि कायद्यावरून कोणत्याहि मनुष्यावर फिर्याद करण्यास अगर अशा अपराधास ह्या आक्टांत जी शिक्षा सांगितली आहे त्या शिक्षेहून जास्त शिक्षा कोणत्याहि इतर कायद्यावरून त्या मनुष्यास देण्यास प्रतिबंध होईल असा ह्या आक्टांतील कोणत्याहि ठरावाचा अर्थ करूं नये; मात्र, एकाच अपराधाबद्दल कोणत्याहि मनुष्यास दोनदां शिक्षा होणार नाहीं.

---

## भाग ७ वा.

### किरकोळ.

पोलीस अमलदारांस आदा करावयाच्या इनामांची वगैरे व्यवस्था.

६९. पोलीस अमलदारांनीं प्रोसेस लागू करण्याबद्दल आदा झालेल्या सर्व रकमा, आणि बातमी देणारे या नात्यानें पोलीस अमलदारांस देणें झालेलीं सर्व इनामें, जप्त झालेला सर्व ऐवज व गुन्हेगारीच्या सर्व रकमा अगर त्यांचा कोणताहि भाग, हीं, या कलमांत यापुढें दिलेले प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं, सरकारांत जमा केलीं पाहिजेत; ह्मणजे, सरकारची मंजुरी घेऊन अगर या संबंधानें सरकारनें केलेला कोणतीहि कानू लागू राहून, असें सगळें इनाम, असा जप्त झालेला सर्व ऐवज अगर अशा गुन्हेगारीच्या सर्व रकमा अगर त्यांचा कोणताहि भाग, विशेष काम केल्यावरून कोणत्याहि पोलीस अमलदारास देण्याचा अगर दोन किंवा अधिक पोलीस अमलदारांमध्यें वांटून देण्याचा अखत्यार आहे.

जिल्हा माजिस्ट्रेटाचा गांवअमलदारावरचा अधिकार डिस्टिक्ट सुपरिंटेंडेंटाकडे सोंपून देण्याचा अखत्यार आहे.

७०. कोणत्याहि जिल्ह्याच्या कोणत्याहि माजिस्ट्रेटास कोणत्याहि गांव, पोलीस अमलदारावर पोलीससंबंधी जो कोणताहि अधिकार असेल तो अधिकार डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंटाकडे सोंपून देण्याचा त्या माजिस्ट्रेटास अख्त्यार आहे.

पोलिसाच्या इमारतींवर कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें कर बसवूं नये.

७१. (१) पोलीस फौजेच्या लोकांनीं, आपलीं कामें सोईनें करतां यावीं ह्मणून कोणत्याहि घराचा अगर जागेचा भोगवटा अगर उपयोग केल्याबद्दल म्युनिसिपल अगर इतर स्थानिक कर देणें सरकारास भाग पडणार नाहीं.

पोलिसाकरितां जागेची सोय करण्याबद्दल म्युनिसिपालिट्यांस हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

(२) शांतता व सार्वजनिक बंदोबस्त राखण्यासाठीं, सार्वजनिक संरक्षणासाठीं, आणि गुन्हे न होऊं देण्यासाठीं कोणत्याहि म्युनिसिपालिटीच्या नोकरींत तिच्या हद्दींच्या आंत जी कोणतीहि पोलीस फौज ठेवलेली असेल, त्या तसें काम करणाऱ्या पोलीस फौजेस वाजवी रीतीनें जरूर लागेल तितकी जागेची सोय अगर तीपैकीं सरकारास रास्त व योग्य वाटेल तितकी जागेची सोय, सरकारानें हुकुम केला असतां, त्या म्युनिसिपालिटीनें केली पाहिजे.

(३) सदरीं सांगितल्याप्रमाणें जागेची सोय करणें अगर या कलमांतील इतर मागण्या मान्य करणें हें, सन १८७३ व १८८४ चे मुंबईचे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट यांत सांगितलेल्या कामांपैकीं एक काम आहे असें समजावें.

फिर्यादी व दावे यांच्या मुदतीबद्दल ठराव.

७२. ह्या आक्टाच्या ठरावांअन्वयें, अगर ह्या आक्टावरून कोणत्याहि मनुष्यास दिलेल्या कोणत्याहि अधिकाराअन्वयें केलेल्या अगर करण्याचा इरादा असलेल्या अगर केल्या आहेत असें ह्मणणें असलेल्या गोष्टींच्या संबंधानें कायदेशीर रीतीनें त्या मनुष्यावर फिर्याद करणें असल्यास आणि त्याविरुद्ध दावा आणणें असल्यास, प्रत्येक प्रसंगीं, तें काम, ज्या कृत्याबद्दल ती तक्रार असेल त्याच्या तारखेपासून साहा महिन्यांच्या आंत चालविलें पाहिजे ; साहा महिन्यांनंतर चालवितां कामास नये.

कित्येक प्रसंगीं दावे काढून टाकावे.

(२) असा कोणताहि दावा—

(अ) ज्या कृत्याबद्दल तक्रार असेल तें द्वेषबुद्धीनें आणि वाजवी व संभवनीय कारणाशिवाय केलें असल्याबद्दल फिर्यादअर्जांत स्पष्ट मजकूर नसल्यास;

(ब) प्रतिवादीवर त्याच कृत्याबद्दल फौजदारींत आधींच फिर्याद केलेली असल्यास;

(क) नुकसानीच्या मोबदल्यासाठीं केलेल्या दाव्याच्या बाबतींत, दावा केला जाण्यापूर्वीं पुरेसा मोबदला मिळाला असल्यास, अगर दावा केल्यानंतर परंतु फैसला होण्यापूर्वीं प्रतिवादीनें अगर प्रतिवादीच्या तर्फेनें पैशाची पुरेशी रकम व खर्चाची रकम कोर्टांत आणून दिल्यास;

काढून टाकिला पाहिजे.

सन १८८८ चा पोलीस आक्ट याचा बचाव.

७३. ह्या आक्टाच्या कोणत्याहि ठरावावरून सन १८७८ चा पोलीस आक्ट याच्या कोणत्याहि ठरावास बाध येणार नाहीं असें समजावें.

## परिशिष्ट अ.

(कलम २ पाहा.)

### रद्द केलेले कायदे.

| कायद्याचा नंबर व वर्ष. | सरनामा अगर विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| सन १८२७ चे मुंबईचें रेग्युलेशन नंबर १२. | सगळ्या मुंबई इलाक्यांत पोलीसपद्धत स्थापन करण्यासाठीं. | कलम १९, रकमा १,६,७ व ८ यांतला जो भाग पूर्वी रद्द केलेला नसेल तो. |

| कायद्याचा नंबर व वर्ष. | सरनामा अगर विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| **मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे आक्ट.** | | |
| सन १८६७ चा ७ वा. | मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट. | कलमें ३३ व ३४ शिवाय करून सगळा आक्ट. |
| सन १८८६ चा ३ रा. | मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट. | सन १८२७चें रेग्युलेशन १२ वें याचें कलम १९, रकमा १,६,७ व ८ या संबंधाचा आणि कलम ३४ वगळून सन १८६७ चा मुंबईचा आक्ट ७ या संबंधाचा परिशिष्ट ब यांतील मजकूर. |

## परिशिष्ट ब.

(कलम ११ पाहा.)

### पोलीस अमलदाराच्या हुद्याच्या दाखल्याचा नमुना.

जिल्हा माजिस्ट्रेटचा शिक्का.

अ. ब. यास जिल्ह्याचे पोलिसांतील असामी नेमिलें आहे; आणि सन १८८९ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट याअन्वयें पोलीस अमलदारास जे अधिकार, कामें आणि हक्क आहेत ते त्यास दिले आहेत.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

आजपर्यंत या इलाक्याच्या डिस्ट्रिक्ट पोलिसचा कारभार भागांचे कमिशनर सरकारच्या देखरेखीस व निर्बंधास पात्र राहून पाहात असत. सन १८८९ सालापासून सरकार एक इन्स्पेक्टर जनरल आफ़ पोलीस नेमीत आलें आहे; त्या अमलदाराचा दर्जा व त्याचे अधिकार सरकारच्या हुकुमांवरून तात्पुरत्या रीतीनें ठरविण्यांत आले होते. तेव्हांपासून आलेल्या अनुभवावरून, एकंदर पोलीस व्यवस्थेंत इन्स्पेक्टर जनरलाचें योग्य स्थान कोणतें, याबद्दल सरकारच्या विचारांत स्पष्टपणा आला आहे. आतां, इन्स्पेक्टर जनरलाचा अधिकार व त्याचीं कामें यांची कायद्याप्रमाणें व्याख्या करणें, आणि तीं ठरवितांना, कमिशनर व जिल्हा माजिस्ट्रेट यांचा एकंदर पोलीस व्यवस्थेशीं संबंध पुनः तपासून त्याची मर्यादा पुनः ठरविणें जरूर पडलें आहे. आणि, मुख्यत्वेंकरून सन १८६१ चा आक्ट ५ याच्या ठरावांअन्वयें हिंदुस्तानच्या इतर प्रांतांत ज्या पोलीस फौजा स्थापिलेल्या आहेत, त्यांची रचना व काम करण्याची पद्धति, यांचा, त्यावरून मुंबईच्या पोलीस व्यवस्थेंत कांहीं सुधारणा करितां येईल अशा उद्देशानें जपून विचार केला आहे; आणि त्या पोलीस फौजांच्या संबंधाचे जे कांहीं ठराव या मसुद्यांत नमूद करणें हिताचें होईल असें वाटलें, ते, इकडे चालू असलेल्या पद्धतीशीं मेळ बसावा ह्मणून, जरूर लागले ते फेरफार करून, या मसुद्यांत घेतले आहेत. जिल्हा माजिस्ट्रेटाच्या हातांत कांहीं अंशीं फौजदारी व वजावणीचे सर्व स्थानिक अधिकार असल्यामुळें, इन्स्पेक्टर जनरलास पोलीस फौजेच्या शिकवण्यासंबंधीं व व्यवस्थेसंबंधीं सर्व अधिकार देऊन त्यांवरचा

त्या माजिस्ट्रेटाचा अधिकार कायम राखणें व स्पष्टपणें नमूद करणें, योग्य वाटल्यावरून आणि तसाच अधिकार प्रत्येक कमिशनरास त्याच्या ताब्यांतल्या प्रदेशाच्या संबंधानें देणें योग्य वाटल्यावरून, तसे ठराव दाखल केले आहेत.

२. सदरीं सांगितलेल्या उद्देशानें हा मसुदा सादर केला आहे; आणि ही संधी साधून पोलीसच्या कायद्यांत ठरावांची नवीन व्यवस्था लाविली आहे, चालू कालाची स्थिति लक्षांत आणून त्या ठरावांत सुधारणा केली आहे आणि चालू कायद्याच्या दोषांवरून, जे नवीन ठराव त्या कायद्यांत नमूद करावे असें वाटलें ते त्यांत नमूद केले आहेत.

बंदोबस्त राखण्याच्या कारणासाठीं आणि लोकांच्या सुखांत अडथळा न यावा या हेतूनें या मसुद्यांत ज्या जागीं माजिस्ट्रेटांस अगर पोलिसास पूर्वीपेक्षां जास्त अधिकार दिलेला आहे, त्या जागीं, अशा दिलेल्या अधिकाराचा दुरुपयोग होऊं नये ह्मणून दूरवर विचार करून सावधागिरीचे ठराव दाखल केले आहेत. पोलिसाचें काम स्वभावतःच निष्ठुरतेचें व द्वेषजनक असें असतें; तें काम करितांना पोलिसानें सौम्यपणानें व ममताळूपणानें वागावें या उद्देशानें कांहीं नवीन कलमें या मसुद्यांत दाखल केलीं आहेत.

३. हा आक्ट सिंध प्रांतास अगर एडनास व त्याच्या अमलाखालच्या प्रदेशांस पहिल्यानें लागू केला जाणार नाहीं. परंतु तो सगळा आक्ट अगर त्याचे योग्य वाटतील ते भाग त्या प्रदेशांस लागू करण्याचा अधिकार सरकारानें आपल्याकडे ठेविला आहे. या मसुद्याचे कित्येक ठराव बाकीचे ठराव अमलांत नसतांहि उपयोगी पडण्यासारखे आहेत, आणि हा सगळा आक्ट लागू करणें अकालिक किंवा अनुचित दिसेल तेव्हां ते ठराव अमलांत आणिले असतां चालण्यासारखें आहे.

(सही) आर. वेस्ट.

तारीख ११ माहे डिसेंबर सन १८८९.

आली जनाब गव्हर्नर साहेब बहादूर यांच्या हुकुमावरून,

जे. जे. हीटन,

आली जनाब मुंबईच्या गव्हर्नरांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

मुक्काम बंदिरें, मुंबई, तारीख ११ माहे डिसेंबर सन १८८९.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.